cmyk

## संपादकीय

### व्होट चोरीचा वणवा सत्ताधाऱ्यांच्या नरडीवर !

'व्होट चोरी' च्या मुद्यावर देशभर वादळ घोंगावू लागले असताना पंतप्रधानांनी आपल्या १०२ मिनिटे केलेल्या भाषणात या कडाडून पेटलेल्या वादावर अवाक्षर न काढून सरकार या मुद्यावर अडचणीत आलेले आहे हे मानावयास वाव आहे. 'व्होट चोर, गद्दी छोड', ही विरोधकांची घोषणा दिवसेंदिवस बळ मिळवत आहे आणि अशावेळी हे सरकारच ११ वर्षात पहिल्यांदा वेढ्यात अडकत चाललेले दिसत आहे. बिहारमधील स्पेशल इंटेन्सिव्ह रेव्हिझीन वरील खटल्याचा सर्वोच्च न्यायालयात निकाल काहीही लागो पण सरकारची आणि निवडणूक आयोगाची नियत लोकांनी ओळखलेली आहे.


दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com


### दत्तात्रय भरणेंना कृषिमंत्रिपद पेलवेना ?

पुणे : क्रीडा खाते बरे होते त्रास नव्हता, आता मात्र त्रास होत आहे, असे वक्तव्य कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी केले आहे. मात्र लगेचच त्यांनी सारवासारव करत हा त्रास नसून ही जबाबदारी आहे, असे वक्तव्य केले. इंदापूर तालुक्यातील दगडवाडी येथे निरा नदीकाठावर पूर संरक्षण भिंत बाधकामाच्या भूमिपूजन सोहळ्यात ते बोलत होते. मात्र भरणेंच्या या वक्तव्यानंतर आता त्यांना कृषीमंत्री पदाचा त्रास होतोय का? भरणे यांच्या या विधानाने त्यांना कृषी मंत्री पद पेलवत नाही का? अशा प्रकारच्या चर्चांना तोंड फुटले आहे.


बीड – महाराष्ट्र | वर्ष–५ | अंक–११४ | मंगळवार, दि.१९ ऑगस्ट २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये



## बहुतांश महसुल मंडळात अतिवृष्टी; बीड जिल्ह्यात दोघांचा पुराच्या पाण्याने मृत्यू

# अर्ध्या मराठवाड्यात ढगफुटी सदृश्य पाऊस

बीड । प्रतिनिधी


गेल्या दोन दिवसापासून मराठवाड्यात पावसाने हाहाकार माजवला असून पुराच्या पाण्यात वाहून गेल्याने मराठवाड्यात आतापर्यंत ६ जण तर बीड जिल्ह्यात पुराच्या पाण्यात वाहून गेल्याने दोघांचा मृत्यू झाला आहे. तसेच नांदेड जिल्ह्यातील सर्वच नद्यांनी धोक्याची पातळी ओलांडली आहे. मराठवाड्यातील बहुतांश महसुल मंडळात अतिवृष्टी झाली असून एनडीआरएफच्या जवानांनी अनेकांना वाचवले आहे. या पावसामुळे राज्यातील ४ लाख हेक्टरवरील पिके पाण्याखाली गेल्याने बाधित झाल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे.





राज्यात पावसाची जोदार बॅटिंग सुरु असून अनेक लहान मोठे प्रकल्प तुडूंब भरले असून नद्यांनी धोक्याची पातळी ओलांडली आहे. छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, बीड, हिंगोली, लातूर आणि नांदेड जिल्ह्यात मुसळधार पाऊस झाला. जोरदार पावसामुळे नद्यांना पुर आल्याने अनेक गावांचा संपर्क तुटला असून शेकडो नागरीक पुराच्या पाण्यात अडकल्याची माहिती आहे. परळी तालुक्यातील हुडा कौडगाव येथील नदीला महापुर आल्याने कार वाहून गेली होती. यात चौघे अडकले होते. मात्र आयपीएस अधिकारी शिंदे आणि सिरसाळा पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरीक्षक गोरक्षनाथ दहिफळे यांनी पान २ वर

## राज्यात ४ लाख हेक्टरवरील पिके बाधित; ६ जणांचा पुरामुळे बळी



### नांदेडमध्ये दोन महिलांचा बळी; २०० जनावरांचा मृत्यू

नांदेड जिल्ह्यात सध्या पुराने वेढलेल्यांना ग्रामस्थांना सोडवण्याचे काम सुरू आहे अशी माहिती जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी दिली आहे. तसेच एनडीआरएफ व प्रशासनाकडून बचावकार्य राबवले जात आहे. जिल्ह्यात दोन महिलांचे मृतदेह पुराच्या पाण्यात वाहून आल्याचे आढळून आले असून २०० पेक्षा अधिक जनावरांचा मृत्यू झाल्याचा अंदाज जिल्हाधिकाऱ्यांनी व्यक्त केला आहे.

### मराठवाड्यात १ लाख हेक्टरवरील पिकांचे नुकसान

मराठवाड्यात पावसामुळे आतापर्यंत सहा लोकांचा बळी गेला. ३०० पेक्षा जास्त छोट्या मोठ्या जनावरांचा मृत्यू झाला. तर ३५० पेक्षा अधिक घरांची आणि गोठ्यांची पडझड झाली. सोबतच ६९८ गावांना पावसाचा फटका बसला आहे. मराठवाड्यातील १ लाख १९ हजार ९६४ शेतकरी पावसामुळे बाधित झाले तसेच १ लाख ११ हजार ४२०.५५ हेक्टर वरील पिकांचे नुकसान झाले आहे.

## पुरात वाहुन गेलेल्यांना वाचवण्यासाठी धनंजय मुंडे यांनी हलवली यंत्रणा

परळी वै. । प्रतिनिधी

परळी वैद्यनाथ तालुक्यातील बहुतांश भागात अतिवृष्टी सदृश परिस्थिती असून परिणामी गावागावांतील नद्यांना पूर आला आहे. याचा फटका कौडगाव हुडा येथील तरुणांना बसला असून कौडगाव हुडा येथील तरुणांची चार चाकी कार गाव पान २ वर



### प्रशासन अलर्टवर, नागरिकांनी सतर्क रहावे – धनंजय मुंडे

दरम्यान परळी वैद्यनाथ मतदारसंघांत परळी शहरासह विविध गावातील अनेक नद्यांना पूर आले असून प्रशासन २४ तास अलर्ट मोडवर आहे. नागरिकांनी नदीकाठी जाणे टाळावे, नदी काठी राहणाऱ्या नागरिकांनी अधिक काळजी घ्यावी तसेच कोणतीही आपत्ती उद्भवत असल्यास तातडीने सुरक्षित स्थळी जावे, कुठल्याही पुलावरून पानी वाहत असल्यास त्यातून वाहने घालू नयेत, तसेच आपत्ती काळात माझ्या कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन धनंजय मुंडे यांनी केले आहे.

## थोडक्यात...

### सदाभाऊ खोत यांच्याकडून सरकारला घरचा आहेर

मुंबई–गोपालक हत्या कायदा बनल्याची टीका आमदार सदाभाऊ खोत यांनी करत सरकारला घरचा आहेर दिला आहे. गोरक्षा हा गोरक्षकांचा गोरख धंदा बनला असून शेतकऱ्यांकडून त्यांची जनावरे रस्त्यात अडवून खंडणी वसुली करण्याचा उद्योग सुरू आहे. यामुळे शेतकऱ्यांना त्यांची भाकड जनावर सांभाळायचे अवघड बनल्याने शेतकरी संकटात सापडला असे सदाभाऊ खोत म्हणाले.

### नांदेडच्या गोदावरी नदीने धोक्याची पातळी

नांदेड–गोदावरी नदीने धोक्याची पातळी ओलांडली आहे. जुन्या नांदेड शहरातील पुलाला पाणी टेकलंय. पाण्याची आवक सुरूच असून पुराचा धोका वाढला आहे. विष्णुपुरीचे ६ दरवाजे उघडले आहेत. तर ६४ हजार ४१२ क्युसेकने विसर्ग सुरू आहे. तासाभरात अजून दोन दरवाजे उघडले जाणार आहेत.

### त्रंबकेश्वर मध्ये भाविकांना पुन्हा मारहाण

नाशिक–दोन दिवसांपूर्वी सुरक्षारक्षकांनी रांगेत उभे असलेल्या भाविकाला चोप दिला होता. पुन्हा एका भाविकाची आणि सुरक्षारक्षकाची हाणामारी त्रंबकेश्वर मंदिरात दर्शनासाठी सध्या गर्दी मात्र मंदिर प्रशासनाच्या सुरक्षारक्षकांकडून दादागिरी सुरूच असून भाविकांना होणाऱ्या मारहाणीवर सर्व स्तरातून टीका होत आहे.

### शेवटच्या श्रावणी सोमवारी शिवालये गजबजली

मुंबई–चौथा श्रावणी सोमवारनिमित्त राज्यातील महादेव मंदिरांमध्ये गर्दी दिसून आली. महादेव मंदिरात पहाटेपासूनच भाविकांच्या रांगा तर त्रंबकेश्वर मध्ये देखील हजारोंच्या संख्येने भाविकांनी दर्शन घेतले.

## दोन वर्षाच्या मुलीला आधी संपवले नंतर आईनेही घेतला गळफास

### हत्या की आत्महत्या घातपाताचा संशय

तलवाडा । प्रतिनिधी

**आपल्या दोन वर्षाच्या मुलीला अगोदर संपवून नंतर आईने देखील गळफास घेऊन आत्महत्या केल्याची दुर्दैवी आणि हळहळ करणारी घटना गेवराई तालुक्यातील मालेगाव मजरा येथे घडली असून हा घातपाताचा प्रकार असावा असा संशय व्यक्त केला जात आहे.**

गेवराई तालुक्यातील तलवाडा पोलीस स्टेशन हद्दीतील मालेगाव मजरा येथे दिं.१८ रोजी दुपारी दुर्दैवी घटना समोर आली आहे.मालेगाव मजरा येथील रहिवासी असलेल्या अंकिता बळीराम घवाडे वय २५ वर्ष. या महिलेने आपली २ वर्षाची मुलगी शिवप्रीती घवाडे हिला आपल्या घरातील माळवदाच्या हलकडीला फाशी देऊन स्वतःही गळफास घेतला. दोन्ही मृतदेह शवविच्छेदनासाठी बीड येथे सिविल हॉस्पिटल मध्ये आणण्यात आले होते तलवाडा पोलीस स्टेशनचे सपोनिक मनोज निलंगेकर पान २ वर

## स्व.देशमुख प्रकरण; कोर्टात ३ तास सुनावणी त्यात कराडच्या वकिलांचा २ तास युक्तिवाद

बीड । प्रतिनिधी

मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणाची आज बीडच्या मकोका न्यायालयात तब्बल तीन तास सुनावणी पार पडली . आरांपी वाल्मिक कराडच्या वकिलांनी तब्बल दोन तास जोरदार युक्तिवाद केल्यानंतर न्यायालयाने कोणताही निर्णय देता तो राखून ठेवला असून या प्रकरणी पुढील सुनावणी ३० ऑगस्ट रोजी होणार आहे .



विशेष सरकारी वकील उज्ज्वल निकम यांनी कराडच्या जामीन अर्जाला तीव्र विरोध दर्शवला. एवढंच नव्हे तर या खटल्यातील इतर आरोपींना दोषमुक्त करण्याच्या मागणीवरही त्यांनी ठाम आक्षेप घेतला. ''हा खटला गंभीर असून आरोपींना कोणतीही सवलत मिळू नये,असा ठाम पवित्रा निकम यांनी न्यायालयात मांडला. आरोपींना जामीन मिळतो का, दोषमुक्त केले जाते का याकडे सर्वांचं लक्ष लागलं आहे. ३० ऑगस्ट रोजी होणाऱ्या पुढील सुनावणीकडे आता सर्वांचं डोळे लागले असून या दिवशी न्यायलयीन निर्णयाची दिशा ठरण्याची शक्यता आहे. वाल्मीक कराडच्या जामीन अर्जाला न्यायालयात जोरदार विरोध केला. या प्रकरणातील दुसरा आरोपी पान २ वर

## खाकी वर्दीतल्या माणुसकीला धनंजय मुंडेंनी केला सलाम

परळी । प्रतिनिधी

परळी तालुक्यातील कौडगाव हुडा – कासारवाडी रस्त्यावरील नदी प्रवाहात एक कार वाहून गेल्याने चार तरुण मध्यरात्री पुरात अडकले होते. याची माहिती मिळताच आ. धनंजय मुंडे यांनी रात्रीतून सूत्र फिरवत चारही बेपत्ता तरुणांच्या तपासासाठी संपूर्ण प्रशासनाला कार्यान्वित केले. चार पैकी तीन तरुणांना वाचवण्यात शासकीय यंत्रणांना व बचाव पथकांना यश आले पान २ वर



## शंभर कोटी मंजूर केल्याच्या जीआर दाखवा नसता बीड करांची माफी मागा

### राष्ट्रवादीच्या स्थानिक नेत्यांनी अजित दादांचे नाव खराब करु नये–सचिन मुळूक

बीड । प्रतिनिधी

बीड शहरातील रस्त्यांसाठी १०० कोटींचा निधी मिळाल्याचा दावा राष्ट्रवादीच्या स्थानिक नेत्यांनी करून बीडच्या नागरिकांची दिशाभूल केली आहे. असा कुठलाही जी.आर. किंवा निधी मंजुरीचे पत्र नसताना उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांनी शंभर कोटी मंजूर केले अशा चुकीच्या बातम्या राष्ट्रवादीच्या स्थानिक नेत्यांनी अजित दादांचे नाव खराब करु नये. उलट मंजूर नसलेल्या कामाचे श्रेय लाटण्याचा हा प्रकार म्हणजे उताविळ नवरा गुडघ्याला बाशिंग असा आहे. राष्ट्रवादीच्या स्थानिक नेत्यांनी बीडच्या शंभर कोटींच्या कामाचा जीआर पान २ वर



## परळीतील गुंडाची हर्सूल कारागृहात रवानगी

परळी । प्रतिनिधी

**जिल्हयातील सार्वजनिक सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी जिल्हयाचे पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांनी गुंडगिरीचे व गुन्हेगारीचे समूळ उच्चाटन करण्याचा उदात्त दृष्टीकोन डोळ्यासमोर ठेवून एमपीडीए कायद्या अंतर्गत बऱ्याच गुन्हेगारांवर व गुंडावर कारवाई करण्याचे योजिले आहे,त्यानुसार शुभम दशरथ जाधव वय ३२ वर्षे रा. नैकोटा ता. सोनपेठ जि. परभणी ह.मु. विद्यानगर परळी वै. ता. परळी जि. बीड याचे विरध्य एमपीडीए कायद्याअंतर्गत स्थानबद्ध करण्याबाबतचा प्रस्ताव जिल्हादंडाधिकारी यांना सादर केला होता.त्यास मंजुरी मिळाल्यानंतर आज त्याची हर्सुलच्या कारागृहात रवानगी करण्यात आली.**

पोलीस ठाणे परळी शहर व सोनपेठ येथे खुनाचा प्रयत्न करणे, अपहरण करणे, गंभीर दुखापत करणे, अवैध शस बाळगणे, जिवे मारण्याच्या धमक्या देणे, शिवीगाळ करणे वगैरे गंभीर स्वरुपाचे एकुण ०४ पान २ वर



## देवेंद्र फडणवीस लवकरच कर्जमाफीची घोषणा करतील

यवतमाळ । प्रतिनिधी

मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या वक्तव्यानंतर आता सरकारमधील एका मंत्र्याने शेतकरी कर्जमाफीसंदर्भात महत्वाचे वक्तव्य केले असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस लवकरच शेतकरी कर्जमाफी जाहीर करतील अशी माहिती मंत्री संजय राठोड यांनी दिली आहे. पुसद येथील कृषी गौरव पुरस्कार वितरण कार्यक्रमात ते बोलत होते. त्यामुळे शेतकऱ्यांच्या कर्जमाफी संदर्भातील आशा आता पल्लवित झाल्या आहेत.



माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या ४६ व्या स्मृतिदिनी यवतमाळच्या पुसद येथे पान २ वर

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.१४ ऑगस्ट २०२५

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ४५.५० क्विंटल | २,५५० | २,८७६ | २,६७० |
| ज्वारी/हायब्रिड :२३.५० क्विंटल | २,१२० | ३,४५० | २,५४४ |
| मका/लोकल:१.५० क्विंटल | २,१०४ | २,१०४ | २,१०४ |
| तूर : १.०० क्विंटल | ६,१५० | ६,१५० | ६,१५० |
| उडीद : १.५० क्विंटल | ५,००० | ५,००० | ५,००० |
| बाजरी: ३४.५० क्विंटल | २,००० | २,९६० | २,६४२ |
| मुग: १.०० क्विंटल | ७,१५० | ७,१५० | ७,१५० |
| सोयाबीन: ४.५० क्विंटल | ४,७०० | ४,७०० | ४,७०० |
| हरभरा: १०.५० क्विंटल | ५,५०१ | ६,००१ | ५,८४३ |

## लेकी बोले सुना लागे.. अजितदादा पुतण्याला बोलले, पण राम शिंदे भडकले

बीड । प्रतिनिधी

**विधानसभा निवडणुकीत कर्जत–जामखेड मतदारसंघातून पराभवाचा सामना करावा लागलेले भाजप नेते आणि विधान परिषदेचे सभापती राम शिंदे यांनी राष्ट्रवादीचे अध्यक्ष आणि राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यावर गंभीर आरोप केले आहेत. अजित पवार यांनी राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांना उद्देशून केलेल्या ''भावकीचा विचार केला नसता तर तू आमदार झाला नसतास,'' या वक्तव्यानंतर शिंदे यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.**

यापूर्वी स्व यशवंतराव चव्हाणच्या प्रति संगमावर अजित पवार आणि रोहित पवार या काका पुतण्यात भेट झाली त्यावेळी अजित पवार रोहित पवारांना बोलले चल पाय धर माझ्या मुळे वाचल्यास मी जर प्रचाराला आलो असती तर तुझी काही खैर नव्हती त्यावर देखील पराभूत उमेदवार व विद्यमान सभापती राम शिंदे भडकले होते त्यांनी नकळत माझ्या पराभवाला आणि पुतण्याच्या विजयला हातभार लावला आता पुन्हा एकदा तोच कित्ता गिरवला गेला त्यावर राम शिंदे यांनी पान २ वर



### दादा नेमकं काय म्हणाले होते

सांगली जिल्ह्यातील इस्लामपूर इथं झालेल्या एका जाहीर कार्यक्रमात पवार काका–पुतण्यात जुगलबंदी रंगली होती. ''मी भावकीकडं लक्ष दिलं, त्यामुळे तू आमदार झालास. जयंतराव त्याला विचारा की किती मतं पडली आहेत, आपण पोस्टल बॅलेटमध्ये निवडून आला आहे. त्यामुळे माझ्या कुणी नादाला लागू नका,'' असं अजित पवारांनी म्हटलं होतं.

cmyk

## अग्रलेख

# व्होट चोरीचा वणवा सत्ताधाऱ्यांच्या नरडीवर !

'व्होट चोरी' च्या मुद्यावर देशभर वादळ घोंगावू लागले असताना पंतप्रधानांनी आपल्या १०२ मिनिटे केलेल्या भाषणात या कडाडून पेटलेल्या वादावर अवाक्षर न काढून सरकार या मुद्यावर अडचणीत आलेले आहे हे मानावयास वाव आहे. 'व्होट चोर, गद्दी छोड', ही विरोधकांची घोषणा दिवसेंदिवस बळ मिळवत आहे आणि अशावेळी हे सरकारच ११ वर्षात पहिल्यांदा वेढ्यात अडकत चाललेले दिसत आहे. बिहारमधील स्पेशल इंटेन्सिव्ह रेव्हिझीन वरील खटल्याचा सर्वोच्च न्यायालयात निकाल काहीही लागो पण सरकारची आणि निवडणूक आयोगाची नियत लोकांनी ओळखलेली आहे.

ज्या पद्धतीने व्होट चोरीच्या मुद्यावर वणवा पेटलेला आहे आणि विरोधी पक्षांनी रान उठवणे सुरु केलेले आहे त्यावरून चिंताजनक परिस्थिती निर्माण झालेली आहे. निवडणूक आयोग सरकारची बटीक झालेली आहे असे चित्र दिवसेंदिवस दृढ होत जाणे हे संसदीय लोकशाहीच्या दृष्टीने ठीक नाही. विखुरलेल्या इंडिया आघाडीला परत एक करण्याचे काम निवडणूक आयोगाने आणि त्याच्या नाकर्तेपणाने केलेले आहे. इंडिया आघाडीतून बाहेर पडलेला आम आदमी पक्ष देखील या मुद्यावर विरोधकांच्या जवळ आलेला आहे. त्यांच्या या मुद्यावरील चिकाटीने राहुल गांधी हे अचानक देशात सर्वात चर्चीला जाणारा नेता बनले आहेत. लोकसभा आणि राज्यसभेत बिहारमधील स्पेशल इंटेन्सिव्ह रिव्हिझन विरुद्ध सरकार चर्चा करू देत नाही तर विविध कारणे सांगून आयोग विरोधी सदस्यांना भेटत नाही. त्यांना उलट अटक केली जाते. यावरून देश काय समजायचे ते समजत आहे. निवडणूक आयोगाची सगळी पापे सत्ताधाऱ्यांच्या पदरात पडत आहेत कारण आयोगावर नेमणूक करण्याच्या समितीमध्ये सरकारचा वरचष्मा आहे आणि पूर्वीचा कायदा बदलून आयोगात आपली खास माणसे सरकारने बसवली आहेत हे त्यांच्या कृतीवरून दिसत आहे माजी मुख्य निवडणूक आयुक्त ओम प्रकाश रावत यांनी तर असा दावा केला आहे की जर आयोगाला राहुल गांधींच्या गंभीर आरोपांना मनापासून उत्तर द्यायचे असेल तर त्याला एक मिनिटापेक्षा जास्त काळ लागणार नाही. याचा अर्थ आयोगाला बरेच काही लपवायचे आहे असाच होतो. माजी निवडणूक आयुक्त अशोक लवासा देखील याबाबत आयोग आणि सरकारवर आगपाखड करत आहेत. लवासा यांच्यासारख्या स्वतंत्र विचाराच्या निवडणूक आयुक्ताला सरकारशी पंगा घेतल्याने अचानक पद सोडावे लागले ही घटना थोड्या वर्षांपूर्वी घडलेली आहे. ज्यांच्या कारकिर्दीत आयोगात बरेच कथित घोटाळे झाले ते माजी मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार अचानक कोठे गायब झालेले आहेत? हे देखील एक गूढ आहे. लोकशाहीला सुदृढ करणाऱ्या आयोगासारख्या संस्थांना गेल्या ११ वर्षात जास्तच कमकुवत करून सरकार आणि सत्ताधारी पक्ष आपल्या पोळीवर तूप ओढून घेत आहेत. एव्हढेच नव्हे तर विरोधकांचा हक्क हिरावून घेत आहे असे आरोप वाढत असतांना आयोग आणि भाजप एकाच सूरात बोलत आहेत. हे काय गौडबंगाल आहे? विरोधी नेत्याच्या सहा लोकसभा मतदारसंघात 'व्होट चोरी' कशी झाली याबाबत भाजप नेते अनुराग ठाकूर यांनी पत्रकार परिषदेत केलेले आरोप त्या पक्षाच्याच अंगलट आलेले आहेत. विरोधी पक्षांना डुबवायला निघालेले भाजप आपल्याच जाळ्यात अडकली आहे असे दिसत आहे. आजी आणि माजी संसद सदस्य सभासद असलेल्या कॉन्स्टिट्यूशन क्लबच्या गेल्या आठवड्यात झालेल्या निवडणूका म्हणजे भाजपवरील मोदी-शहा यांचा वाचक कमी होत चालला आहे काय असे प्रश्न उभे करतो. या निवडणूकीत भाजपच्या राजीव प्रताप रुडी विरुद्ध त्याच पक्षाच्या संजीव बाल्यान यांच्यात लढत झालेली असली तरी त्यात रुडी यांचा झालेला विजय हा विरोधी पक्षांच्या पाठिंब्यामुळे झाला हे स्पष्ट होत आहे. अमित शहा यांनी या निवडणूकीत जास्त लक्ष घालून बाल्यान यांना उभे केले होते. बाल्यान यांचा पराभव म्हणजे केवळ शहा यांना धक्का आहे असा नव्हे तर चिरेबंदी भाजपमध्ये सुप्त मतभेद उफाळून येत आहेत असा आहे.

## जालना पोलिसांच्या सतर्कतेमुळे एक कोटी २९ लाखा व्यापाऱ्याला परत मिळाले



**जालना । प्रतिनिधी**

**जालना व्यासायीकाची ०१ कोटी २९ लाख केले रिक्व्हर करून दिल्याबद्दल जिल्हा पोलीस प्रशासनाचे आभार मानण्यात आले .जालना शहरातील येथील व्यापारी व्यंकटेश आईल मिल चे मालक यांनी पोलीस ठाणे सायबर जालना येथे दिनांक २६/०२/२०२५ रोजी तक्रारीवरून पोलीस ठाणे सायबर जालना येथे गुन्हा रजिस्टर नंबर ०८/२०२५ कलम ३१८(४) व ६६ डी आयटी ॲक्ट प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आले होते. गुन्हयातील संशयीत आरोपी कपील दोषी व यश दोषी रा. आकोला यांनी सफल आईल आणी सीडस अहमदाबाद चे संचालक ललीतकुमार जैन, पालनपुर, गुजरात महावीर ॲग्रो, सुरत, गुजरात चे संचालक नरेश शहा, सु रत गुजरात यांनी ९६ मेट्रीक टन सोया रिफाईन खादय तेल देतो म्हणुन वरील आरोपीतांनी संगनमत करुन १ कोटी २९ लाख रुपयेची फसवणुक केली होती.**

सायबर पोलिसांनी तांत्रिक तपास सुरू करून फिर्यादी व्यापारी यांची फसवणूक झालेली तब्बल १कोटी २९ लाखांची रक्कम फसवणूक करणाऱ्यांच्या बँक खात्यांतून परत फिर्यादीला मिळवुन दिली आहे. सायबर फसवणुकीच्या वाढत्या प्रकरणांतून पीडितांना दिलासा मिळावा यासाठी पोलिसांनी तांत्रिक तपास सुरू केला. त्यात फसवणूक करणाऱ्यांची बँक खाती शोधून फ्रीज करण्यात आली. याच खात्यांतून ही मोठी रक्कम वसूल करण्यात यश आले. या यशस्वी तपासाबद्दल मा.पोलीस अधिक्षक श्री. अजयकुमार बन्सल, मा. अप्पर पोलीस अधिक्षक आयुष नोपाणी यांनी विशेष समाधान व्यक्त करत पोलीस निरीक्षक गुणाजी शिंदे व त्यांच्या सायबर पथकाचे कौतुक केले. सदरची कारवाई मा. श्री. अजय कुमार चन्सल , पोलिस अधीक्षक, श्री. आयुष नोपानी साहेब, अपर पोलिस अधीक्षक जालना, उपविभागीय पोलीस अधिकारी जालना श्री. अनंत कुलकर्णी यांचे मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक / गुणाजी शिंदे, पोउपनि योगेश चव्हाण, पोउपनि सुनिल पाटोले, पोहेको सचिन चौधरी, पोहेको संदीप माटे, पोको दिलीप गुसींगे व सायबर पोलीसांनी केली आहे.

## पाण्यापासून वंचित राहणाऱ्या घरांना पाणीपुरवठा जोडणी पूर्ण

**जालना । प्रतिनिधी**

अजीम प्रेमजी फाउंडेशन आणि मराठवाडा ग्रामीण विकास संस्था यांच्या संयुक्त सौजन्याने जल संवर्धन व पाणी पुरवठा प्रकल्पांतर्गत मोजे क्रातीनगर (ता. घनसावंगी, जि. जालना) येथे पाण्यापासून वंचित घरांना पाणीपुरवठा जोडणी देण्यासाठी नवीन पाईपलाईन टाकण्याच्या कामाचा शुभारंभ १८ ऑगस्ट रोजी करण्यात आला.

उद्घाटन प्रसंगी गावाचे गाव समितीचे अध्यक्ष सुदाम झोपडे अनुप मोरे , शितल पराडे, मंगल बाई झोपडे भीमराव पराडे गंगा दाभाडे गंगुबाई साळवे उसतोड कामगार समिती अध्यक्ष पवार, पाईपलाईनचे कॉन्ट्रॅक्टर तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. या वेळी प्रकल्पाच्या महत्त्वाविषयी माहिती देत पाणीपुरवठा व्यवस्थेत होणाऱ्या सुधारणा आणि त्याचा दीर्घकालीन लाभ यावर भर देण्यात आला. मराठवाडा ग्रामीण विकास संस्था, छ. संभाजीनगर यांच्या वतीने पाण्याचे महत्त्व, त्याचा योग्य वापर आणि पाणी बचत याविषयी ग्रामस्थांना मार्गदर्शन करण्यात आले. तसेच, ज्या घरांना पाईपलाईन जोडणी हवी आहे, त्या कुटुंबांना आवश्यक प्रशिक्षण देण्यात आले. कार्यक्रमानंतर तात्काळ प्रत्यक्ष पाईपलाईन टाकण्याचे काम सुरू करण्यात आले. या उपक्रमामुळे क्रातीनगर येथील पाणीटंचाईत लक्षणीय घट होऊन प्रत्येक घरापर्यंत स्वच्छ व सुरक्षित पाणी पोहोचेल, असा विश्वास ग्रामस्थांनी व्यक्त केला. या प्रकल्पासाठी मार्गदर्शन प्रकल्प संचालक व सचिव अप्पासाहेब उगले सर आणि ओमकार उगले सर यांनी केले. तसेच, प्रकल्प व्यवस्थापक राहुल गाढवे, जिल्हा समन्वयक एकनाथ राउत तांत्रिक पर्यवेक्षक संदीप जाधव, समुदाय संघटक विकास कांबळे, राजेश वाघमारे व गावातील युवक ग्रामस्थ मोठ्या संख्यने उपस्थित होते यांनी परिश्रम घेतले.

## विदेशी महागली, देशी दारूचे अच्छे दिन आले

### देशी दारू पिणाऱ्याची संख्या वाढली

**जालना । प्रतिनिधी**

**राज्यामध्ये सरकारने विदेशी दारूचा करवाढीमुळे भाव वाढला यामुळे देशी दारू चे अच्छे दिन आले यामुळे जे विदेशी पिणारे ते आता देशी प्यायला लागले . अनेक दारू प्रेमी आता देशीकडे वळले आहेत. ब्रेड निष्ठा सोडून देशप्रेमी बनण्याची ही वेळ मद्यपींवर कधीच आली नव्हती. तसेच देशी दारू दुकानांमध्ये लायसन नसणाऱ्या व्यक्तीला सुद्धा दारू दिला जाती जाती याकडे दारूबंदी विभागाचे कोणतेच लक्ष नसण्याचे दिसून येत आहे आयुष्यामध्ये तरुण वर्ग देशी दारूचा नाद लागून स्वतःचं आयुष्य ची नुकसान होणार आहे याची दखल राज्य सरकारने घेणे गरजेचे आहे.**




पूर्वी विदेशी दारूच्या एका पार्टीसाठी चार-पाच मित्र एकत्र येऊन पैसा जमा करत, बाटली उघडत आणि रात्रीचा जल्लोष सुरू होत असे. मात्र आता महागाईच्या झटक्यामुळे ती बाटली परवडेनाशी झाली आहे. त्यात एकाच बाटलीवर सर्वांची नशा भागत नसल्याने मित्रांमध्ये कट मारून थेट देशी दारूकडे धाव घेण्याचे प्रमाण वाढले आहे. बियर, देशी हातभट्टी व गावठी दारूच्या दुकानासमोर सकाळपासूनच रांगा लागतात. दुसरीकडे बार, हॉटेल्स आणि परमिट रूमचे हॉटेल मालकावर बुरे दिन आले आहे टेबल रिकामे पडले आहेत. मोठ्या बाईन शॉपमध्ये एमआरपीनुसार दारू मिळत असल्याने लहान विक्रेत्यांचे नुकसान झाले आहे. शिवाय, हॉटेलमध्ये बाहेरून आणलेले मद्य पिण्यास सक्त मनाई आहे. त्यामुळे अनेक परमिट रूममधील ग्राहकसंख्या कमी झाली असून, काही व्यवसाय बंद पडण्याच्या मार्गावर आहेत. भाववाढीपूर्वी मित्रांचा घोळका जमून पार्टी रंगायची. आता मात्र प्रत्येकजण आपली बाटली गुपचूप घेऊन थेट घर गाठतो. गावोगावी आणि शहरात हाच नवा ट्रेंड पाहायला मिळते. सर्वसामान्य, कामगार वर्ग व हॉटेल व्यवसायिकांनी राज्य सरकारवर टीका करत आहे.

## पिंपळवंडी येथील श्री.अश्वत्थलिंग यात्रा उत्सवाची महंत महादेवानंद महाराज भारती यांच्या काल्याच्या किर्तनाने भक्तीमय वातावरणात सांगता

**पिंपळवंडी । प्रतिनिधी**

पाटोदा तालुक्यातील पिंपळवंडी येथील श्री क्षेत्र अश्वत्थलिंग महादेव पार्वती ४ थ्या श्रावणी सोमवार यात्रा उत्सवाची संस्थानचे मठाधिपती महंत ह.भ.प.महादेवानंद भारती महाराज यांच्या सुश्राव्य काल्याच्या किर्तनाने दि.१८/०८/२०२५ सोमवार रोजी भक्तिमय वातावरणात झाली.या सांगता सोहळ्याला अंमळनेर जिल्हा परिषद गटाचे भाजपा ज्येष्ठ नेते भाऊसाहेब आण्णा भवर यांची प्रमुख उपस्थिती होती.या प्रसंगी किर्तनातून महंत महादेवानंद भारती महाराज यांनी काल्याच्या किर्तनाचे सविस्तर विवेचन करून काला,विषयी सविस्तर माहिती सांगून भगवान श्रीकृष्णाने बाल सवंगड्या समवेत दही व दूध, भाकरीचा काला करून सवंगड्या समवेत आनंद लुटत हीच काल्याची परंपरा आजही काल्याच्या किर्तनातून जोपासली जात आहे.दही,दूध,भात हे पांढरे शुभ्र असते ते शांततेचे प्रतीक आहे.सर्वांनी भगवान श्रीकृष्णाची शिकवण व आदर्श समोर ठेवून एकमेकांशी प्रेमाने वागून एक विचाराचा काला सर्वांनी अंगी बाळगून एकमेकांना सहकार्य करावे तसेच येथील देवस्थान व मठ परंपरा महान असून या ठिकाणी अनेक देवतांचे दर्शन घडते.याची सविस्तर किर्तनातून ओळख करून दिली.महंत महादेवानंद भारती महाराज व ग्रामस्थांच्या वतीने आमदार सुरेश धस यांचे कट्टर व एकनिष्ठ कार्यकर्ते भाऊसाहेब भवर यांचा विशेष सत्कार करून,महादेवानंद भारती महाराज यांचाही ग्रामस्थ व भाऊसाहेब भवर यांनी सत्कार केला.महंत महादेवानंद भारती महाराज यांनी भाऊसाहेब भवर यांचा अंमळनेर जि.प.गटाचे भावी जि.प.सदस्य म्हणून उल्लेख करून पुढील राजकीय वाटचालीस भवर यांना आशिर्वाद दिले.तसेच ते म्हणाले की,भाऊसाहेब भवर हे या जि.प.गटातील व परिसरातील एक दानशूर व्यक्तिमत्व म्हणून ओळखले



जातात.त्यांचा विविध धार्मिक कार्यक्रमात सुरू असलेला अन्नदानाचा उपक्रम कौतुकास्पद आहे.भाऊसाहेब भवर हे येथील यात्रा उत्सव सांगता सोहळ्याची महाप्रसादाची पंगत मागील ३ वर्षापासून देत आहेत.यावर्षीची ४ थी पंगत आहे.तसेच त्यांनी श्री.क्षेत्र अश्वत्थलिंग देवालयाच्या पंढरपूर येथील प्रशस्त मठाच्या बांधकामासाठी दोन लाख बावीस हजार तसेच श्री.क्षेत्र आळंदी येथील सुरू असलेल्या मठाच्या बांधकामासाठी पाच लाख रुपये देणगी स्वरूपात मदत केली आहे.तसेच त्यांचा येथील कोणत्याही कार्यक्रमात सतत सहभाग असतो.व ते देणगीच्या स्वरूपात सहकार्य करण्यास अग्रेसर असतात.अंमळनेर जि.प.गटातील गणपती उत्सव असोत,नवरात्र उत्सव असोत तसेच महापुरुषांच्या जयंती त्या मंडळासाठी वर्गणी देऊन उत्सव समिती मंडळांना मदत करतात.तसेच या परिसरातील श्री.क्षेत्र गहिनीनाथ गडाच्या पुण्यतिथी सोहळ्याला ५१ पोते साखर,भगवान भक्ती गड सावरगाव कार्यक्रमाला २१ पोते साखर,महादेव मंदिर मुगगाव सप्ताह कार्यक्रमाला ७ पोते साखर, श्री.क्षेत्र हनुमान गड कार्यक्रम ११ पोते साखर देऊन धार्मिक सोहळ्यास मदत केली आहे.भाऊसाहेब भवर यांचा धार्मिक उत्सव व सोहळ्यात सतत सहभाग असल्याने त्यांचे परिसरात अन्नदाता म्हणून सतत नाव घेतले जात आहे.धार्मिक कार्यक्रमाबरोबर शैक्षणिक कार्यात विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप,गरजू गरीब कुटुंबातील महिलांना साडी-चोळी वाटप,रक्तदान शिबीरांचा उपक्रम राबवितात.या सांगता सोहळ्याला ह.भ.प.परमानंद महाराज भारती,ह.भ.प.नारायण महाराज बजगुडे,सरपंच निलेश मोरे ,अशोक जेधे,महेश खेंगरे,रविंद्र केकान,अंकुश सुळे,उपसरपंच दादा पवार,पोपट पवार तसेच ए.पी.आय. विक्रांत हिंगे,पी.एस.आय.कृष्णा चव्हाण आदीसह आजी-माजी सरपंच,उपसरपंच,ग्रामपंचायत सदस्य,चेअरमन व पंचक्रोशीतील भाविक-भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.काल्याच्या किर्तनानंतर महाप्रसादाच्या पंगती झाल्या.दर्शनासाठी भाविक-भक्तांची सकाळपासून मोठी गर्दी पहावयास मिळाली.अंमळनेर पोलीस ठाण्याचे ए.पी.आय.विक्रांत हिंगे,पी.एस.आय. कृष्णा चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली स.फौ. राठोड,बाबर,पो.ह.शिंदे,डोंगरे, जाधव,सुंबरे,खाडे,बहिरवाल, आदीसह पुरुष,महिला होमगार्ड यांनी चोख बंदोबस्त ठेवला होता.

# पान १ वरून...

### अर्ध्या मराठवाड्यात ढगफुटी

जीव धोक्यात घालून तिघांचा जीव वाचवला असून केज तालुक्यातील एका तरुणाचा हुडा कौडगाव येथे पुराच्या पाण्यात वाहून गेल्याने मृत्यू झाला असून बीड जिल्ह्यात दोघांचा पुराच्या पाण्यात वाहून जाण्यामुळे दोघांचा तर मराठवाड्यात आतापर्यंत पुरामुळे ६ जणांचा बळी गेला आहे. मालजगाव, परळी, धारुर तालुक्यात अतिवृष्टी झाली असून पिके पाण्याखाली आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले आहे. परभणी जिल्ह्यातील ५२ महसुल मंडळापैकी ४५ महसुल मंडळात अतिवृष्टी झाली असून ३० पेक्षा जास्त म्हशी पुराच्या पाण्यात वाहून गेल्या आहेत. नांदेड जिल्ह्यात अनेक गावांचा पुरामुळे संपर्क तुटला असून एनडीआरएफच्या जवानांनी मदत कार्य केल्याने अनेकांचा जीव वाचला आहे. मागील तीन ते चार दिवसांपासून जिल्ह्यात सुरू असलेल्या अतिवृष्टीमुळे तब्बल ३८ हजार एकरांवरील खरीप पिकं बाधित झालीत. महसूल व कृषी विभागाने याबाबतचा प्राथमिक अहवाल सादर केला असून १०८ गावांच्या शेतशिवाराला फटका बसल्याची माहिती समोर आली आहे. जिल्हा प्रशासनाच्या अहवालानुसार, ३८ हजार ३१५ हेक्टरवरील पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. हिंगोली जिल्ह्यातील २२ महसूल मंडळामध्ये अतिवृष्टीची नोंद झाली असून जोरदार पावसामुळे औंढा नागनाथ शहरातील आदिनागनाथ मंदिराच्या गाभाऱ्यात चार फूट पाणी साचले. त्यामुळे श्रावणी सोमवार असताना भाविकांना शिवलिंगाचे दर्शन करण्यासाठी मंदिरात जाता आले नाही. त्यामुळे भाविकांना मंदिराच्या बाहेरूनच दर्शन घेऊन माघारी परतावं लागले. दरम्यान राज्यात पावसाने मोठे नुकसान झाले असून जवळपास ४ लाखापेक्षा पिके पावसामुळे बाधित झाल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे.

---------

### पुरात वाहुन गेलेल्यांना वाचवण्यासाठी

नदीच्या पुरत रात्री उशिरा वाहून गेली. या गाडीतील चौघांपैकी तीन जणांना वाचवण्यात बचाव पथकांना यश आले असून एक तरुण मयत झाला असून त्याचे पार्थिव सिरसाळा येथील शासकीय रुग्णालयात पाठविण्यात आले आहे. रविवारी मध्यरात्री कौडगाव - कासारवाडी रस्त्यावर मारुती बलिनो गाडी पुरात वाहून गेली. ही घटना रविवारी रात्री ११:३० ते १२ च्या दरम्यान घडली असून या घटनेची माहिती स्थानिकांनी तत्काळ या भागाचे आमदार धनंजय मुंडे यांना कळवली आता श्री मुंडे यांनी तात्काळ प्रशासकीय यंत्रणांना सज्ज करून बचाव कार्याला वेग आणला. उपविभागीय अधिकारी अरविंद लाटकर, उपविभागीय पोलिस अधिकारी, सिरसाळा पोलीस ठाण्याचे सपोनी गोरक्षनाथ दहिफळे, तहसीलदार व्यंकटेश मुंडे, जगमीत्र कार्यालयाचे समन्वयक बाबुराव रुपनर हे बचाव पथकांना घेऊन मध्यरात्री घटना स्थळी दाखल झाले होते. पाण्याचा प्रवाह अत्यंत जास्त असल्याने बचाव कार्याला अडथळे येत होते, त्यामुळे धनंजय मुंडे यांच्या मार्फत बीडचे जिल्हाधिकारी तसेच पालकमंत्री अजित दादा पवार यांच्या कार्यालयास संपर्क करून एन डी आर एफ च्या पथकास पाचारण करण्यात आले. हे पथकही तातडीने रवाना झाले. दरम्यान या घटनेत वाहून गेलेल्या अमर मधुकर पौळ (वय २२) रा. डिग्रस, राहुल संपती पौळ (वय ३२), राहुल सटवाजी नवले (वय २२) रा. फुलारवाडी ता. पाथ्री या तिघांना सुखरूप बाहेर काढण्यात यंत्रणांना यश आले असून विशाल बल्लाळ (वय २४) रा. बोरी सावरगाव ता. केज हा तरुण मयत झाला असून त्याचा मृतदेह सिरसाळा येथील शासकीय रुग्णालयात पाठविण्यात आला आहे. पहाटे युवक नेते अजय मुंडे हे घटनास्थळी दाखल झाले होते, त्यांनी ग्रामस्थांशी व प्रशासकीय यंत्रणांशी चर्चा केली. धनंजय मुंडे हेही दूरध्वनीवरून रात्रभर यंत्रणांच्या संपर्कात होते, तसेच त्यांचे सहकारी राजाभाऊ पौळ, सुभाष नाटकर, तसेच धनंजय मुंडे यांच्या जगमित्र कार्यालयाची टीम घटनास्थळी मदत कार्यात उपस्थिती होती.

------------

### स्व.देशमुख प्रकरण; कोर्टात ३ तास सुनावणी

विष्णू चाटे याने दाखल केलेल्या दोषमुक्ती अर्जावरही निकम यांनी सडेतोड युक्तिवाद केला. आजची सुनावणी तब्बल तीन तास पार पडली अटक करताना कराडला अटकेची कारणे सांगितली गेली नव्हती. मात्र, निकम यांनी हा दावा खोडून काढला. निकम यांनी सीडीआर सादर करून फेटाळला. ''सीडीआरनुसार कराडने त्या दिवशी फोन केल्याची नोंद आहे,'' असे त्यांनी न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले. मात्र न्यायालयाने कोणताही निर्णय न देता तो राखून ठेवला असून या प्रकरणी पुढील सुनावणी ३० ऑगस्ट रोजी होणार आहे.

--------------

### दोन वर्षाच्या मुलीला आधी संपवले

यांना या घटनेची माहिती मिळतात घटनास्थळी दाखल झाले होते सदरील प्रकरण कुठल्या कारणाने घडले हे अद्याप समजू शकले नाही. या घटनेमुळे संपूर्ण परिसरामध्ये हळहळ व्यक्त केली जात आहे

-----------

### शंभर कोटी मंजूर केल्याच्या जीआर

चोविस तासात प्रसिद्ध करावा नसता बीडकरांची माफी मागावी असे शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांनी म्हटले आहे. राष्ट्रवादीच्या स्थानिक नेत्यांनी निधीसाठी उपमुख्यमंत्री व पालकमंत्री अजित दादा पवारांकडे पाठपुरावा केलाही असेल परंतु शंभर कोटींचा निधी मंजूर केल्याचा थेट बनाव करुन हे नेते बीडकरांना गाजर दाखवत आहेत. बीडकरांची दिशाभूल करण्याचा सक्षम वारसा चालवत असल्याचे स्पष्ट झाले आहे. राष्ट्रवादी पक्षांतर्गत एकमेकांचे कट्टर विरोधकांनी जनतेसमोर निधी मंजूर केल्याचा बनाव उभा केला. परंतु बीडची जनता आता दूध खुळी राहिली नाही त्यामुळे खरोखरच निधी मंजूर झाला आहे का, हा प्रश्न नागरिकांमध्ये उपस्थित झाला आहे. शहरातील कचऱ्यासारखी वस्तुस्थिती डोळ्यासमोर असताना कोटी कोटींचा निधी आणला हा राष्ट्रवादीच्या स्थानिक नेत्यांचा दिखावूपणा आहे असेही शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांनी म्हटले आहे. केवळ माध्यमांसमोर मोठमोठे दावे करणे आणि नागरिकांना गोंधळात टाकणे ही पद्धत बंद करावी. जी.आर.शिवाय केलेले सर्व दावे हे केवळ बनाव आणि राजकीय दिखावा आहेत. जनतेला गोंधळात टाकणे आणि स्वतःची पाठ थोपटणे थांबून अजितदादा सारख्या सक्षम नेतृत्वाचं नाव खराब करू नये असा माझा त्यांना मित्रत्वाचा सल्ला आहे असे जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांनी सांगितले आहे .

----------

### खाकी वर्दीतल्या माणुसकीला

असून एका तरुणाचा दुर्दैवाने मृतदेह आढळला आहे. या घटनेची माहिती आपल्या सोशल मीडिया हँडलवर शेअर करताना धनंजय मुंडे यांनी उपविभागीय पोलीस अधिकारी ऋषिकेश शिंदे व शिरसाळा पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक गोरक्षनाथ दहिफळे यांच्या कार्याचे कौतुक करत त्यांच्यातील त्यांच्या खाकीवर्दीच्या आतील माणुसकीला आपला सलाम असल्याचे म्हटले आहे. जवळपास बारा तास पेक्षा अधिक चाललेल्या या बचाव कार्यामध्ये अमर पौळ या तरुणाला वाचवण्यासाठी उपविभागीय पोलीस अधिकारी ऋषिकेश शिंदे व सहाय्यक पोलीस निरीक्षक गोरक्षनाथ दहिफळे यांनी स्वतःच आपला जीव धोक्यात घालत पूर्ण प्रवाहामध्ये उडी घेतली. इतकेच नव्हे तर या दोघांनी पूर प्रवाहाच्या विरुद्ध पोहत जाऊन या तरुणाला अत्यंत सुखरूप पद्धतीने बाहेर काढले. रात्रीच्या भिन्न काळोखामध्ये पूर प्रवाहाच्या विरुद्ध दिशेने आपला जीव धोक्यात घालून उडी घेत त्या तरुणाचे प्राण वाचवणाऱ्या डीवायएसपी ऋषिकेश शिंदे व एपीआय गोरक्षनाथ दहिफळे यांच्यातील खाकी वर्दीतल्या माणुसकीला आपला सलाम असल्याचे धनंजय मुंडे यांनी आपल्या एक्स पोस्ट मध्ये म्हटले आहे. या ऑपरेशन मध्ये उपविभागीय अधिकारी अरविंद लाटकर, तहसीलदार व्यंकटेश मुंडे, या भागातील पदाधिकारी राजाभाऊ पौळ, सुभाष नाटकर, यांच्यासह अजय मुंडे तसेच धनंजय मुंडे यांच्या कार्यालयीन यंत्रणेने रात्रभर जागून बचाव कार्यात मदत केली.

----------

### देवेंद्र फडणवीस लवकरच

राज्यातील प्रयोगशील १३ शेतकऱ्यांना वसंतराव नाईक कृषि प्रतिष्ठानच्या वतीने कृषी गौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. राज्यात एकीकडे शेतकऱ्यांना कर्जमाफी कधी मिळणार असा सवाल उपस्थित होत असताना दुसरीकडे मुसळधार पावसामुळे शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाल्याचे चित्र आहे. त्यामुळे, शेतकरी कर्जमाफीची मागणी जोर धरत असतानाच आता राज्यात ओला दुष्काळ जाहीर करण्याचीही मागणी केली जात आहे. दरम्यान, कर्जमाफीसंदर्भात मुख्यमंत्री लवकरच निर्णय घेतील, असे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी म्हटले होते. तर, आमच्या जाहीरनाम्याप्रमाणे कर्जमाफी करू, असेही उपमुख्यमंत्री अजित पवारांनी सांगितले होते. आता, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस लवकरच कर्जमाफीची घोषणा करतील, अशी माहिती महायुती सरकारमधील मंत्री संजय राठोड यांनी दिली आहे.

**शेतकरी म्हणून कर्जमाफीची गरज - कृषिमंत्री**

मी शेतकरी पुत्र, माझा जन्म शेतकरी घरात झाला आहे. सकाळी उठलो तरी मला शेती दिसते, रात्री झोपायला गेल्यावर ही शेती दिसते. त्यामुळे शेतकऱ्यांच्या अडचणी मला माहित आहेत, असे म्हणत शेतकरी कर्जमाफीबाबत मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्री योग्यवेळी निर्णय घेतील, असे नव्याने कृषि खात्याचा पदभार स्वीकारलेले कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी म्हटले आहे. धाराशिव येथे शेती नुकसान पाहणीसाठी आले असता त्यांनी कर्जमाफीबाबत वक्तव्य केले. एक शेतकरी म्हणून कर्जमाफीची गरज असल्याचे मत देखील त्यांनी व्यक्त केले आहे.

---------

### परळीतील गुंडाची हर्सूल

गुन्ह्याची नोंद पोलीस अभिलेखावर आहे, त्यापैकी ०२ गुन्हे नहायप्रविष्ठ असुन ०२ गुन्हे पोलीस तपासावर आहे. तसेच नमुद इसमावर त्याने आपली वर्तनक सुधारावी म्हणून यापूवी एक वेळा प्रतिबंधक कारवाई करण्यात आली होती. परंतु सदर इसम हा प्रतिबंधक कारवाईस न जुमानता पुन्हा चढत्या क्रमाने गुनी करण्याचो श्रृंखला चालुच ठेवुन होता, त्याची परळी शहर व परीसरात प्रचंड दहशत आहे, गोपणीय खबऱ्याच्या आधारे पोनि शिवाजी बटेवाड यांनी ताबे पोलीस अंमलदार यांचे मार्फतीने आज दिनांक १८.०८.२०२५ रोजी सदर इसमास परळी शहरातुन ताब्यात घेऊन पो. स्टे. परळी शहर येथे हजर केले, त्यानत्तर पो.नि. परळी शहर यांनी सदर इसमास आज दिनांक १८.०८.२०२५ रोजी १५.५२ वा. कायदेशीररीत्या ताब्यात घेऊन त्यास योग्य पोलोस बंदोबस्तात हर्सल कारागृह, छ. संभाजीनगर येथे स्थानबध्द करण्यासाठी रवाना केले.सदरची कामगिरी पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत अपोअ बीड, चेतना तिडके, ऋषीकेश शिंदे (अपोत्र) पो.नि. श्री शिवाजी बंटेवाड स्थागुशा बीड यांचे मार्गदर्शनाखाली पो.नि. रघुनाथ नाचण, सपोनि नितीन गड्डुवार, पोह किशोर पटमाळ पंडीत पांचाळ, सर्व पो.स्टे. परळी शहर तसेच सपोउपनि अभिमन्यु औताडे, गोविंद भताणे, रामचंद्र केकाण, सचिन आंधळे, विवीषण चव्हाण सर्व नेमणुक स्थागुशा बीड यांनी केलेली आहे.

--------------

### लेकी बोले सुना लागे.. अजितदाद

दावा केला की, अजित पवार यांचे हे वक्तव्य म्हणजे मला सातत्याने टॉर्चर करण्याचा प्रयत्न आहे. त्यांमुळे याबाबत भाजपच्या वरिष्ठ नेत्यांना योग्य निर्णय घेण्याची मागणी शिंदे यांनी केली आहे.राम शिंदे यांनी पत्रकार परिषदेत सांगितले की, अजित पवार यांनी वारंवार अशा वक्तव्यांद्वारे ''शिळ्या कढीला उत आणण्याचा'' प्रयत्न केला आहे. कर्जत-जामखेड मतदारसंघात माझ्या पराभवामागे पवार कुटुंबातील अघोषित करार आणि नियोजित कट होता, असा हल्लाबोल राम शिंदे यांनी केला आहे. पुढे शिंदे यांनी म्हटले की, अजित पवारांनी महायुतीचा धर्म पाळला नाही आणि त्यांना सभेसाठी बोलावूनही ते आले नाहीत. यामुळे त्यांचा पराभव १ हजार २४३ मतांनी रोहित पवार यांच्याकडून झाला, असा दावा शिंदे यांनी केला आहे. दरम्यान, या आरोप-प्रत्यारोपांमुळे महायुतीत नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. राम शिंदे यांनी पक्षश्रेष्ठींकडे तक्रार करताना, अजित पवार यांच्या भूमिकेमुळे महायुतीच्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाल्याचे म्हटले आहे. दुसरीकडे, राष्ट्रवादी काँग्रेसने शिंदे यांचा गैरसमज झाल्याचा दावा केला आहे. या प्रकरणाने राजकीय वर्तुळात खळबळ उडवली असून, महायुतीतील अंतर्गत तणाव पुन्हा एकदा समोर आला आहे.तसे पहिले तर अजित पवारांकडून हे वक्तव्य दुसऱ्यांदा झाल्याने आणि ते त्याच्या पुतण्याला उद्देशून बोलले पान ते लागले भाजपचे राम शिंदे याना आत या मुळे पुन्हा एकदा महायुतीत वादाची ठिणगी पडली आहे.

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

मंगळवार दि. १९ ऑगस्ट २०२५




## थोडक्यात...

### शेतकऱ्यांना आर्थिक मदत करा –गणेश बजगुडे पाटील

बीड । प्रतिनिधी



मागील आठ दिवसात बीड जिल्ह्यासह तालुक्यातील सर्वच महसुल मंडळात मोठ्या प्रमाणात अतिवृष्टी झालेली असुन २४ तासांपेक्षा जास्त काळ सततचा मुसळधार पाऊस बीड तालुक्यात झालेला असल्याने शेतीला अक्षरशः तलावाचे स्वरूप आलेले आहे. शेतकऱ्यांच्या सोयाबीन, मुग, कापुस, बाजरी, तूर यासारख्या अनेक पिकांचे व पशुधनाचे देखील मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले आहे. एकतर शेतकरी कर्जबाजारीपणामुळे हवालदिल असताना सणासुदीच्या तोंडावर खरिपाच्या पिकांची मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले आहे त्यामुळे तत्काळ नुकसानीचे पंचनामे करुन शेतकऱ्यांना तत्काळ आर्थिक मदत करण्यात यावी अशी मागणी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष गणेश दादा बजगुडे पाटील यांनी केली आहे.

### छायाताई मोरे यांचे निधन

आष्टी । प्रतिनिधी



आष्टी शहरातील मातोश्री नगर मध्ये वास्तव्यास असणारे दादासाहेब मोरे यांच्या पत्नी छायाताई मोरे गेल्या आठ दिवसापासून अहिल्यानगर येथील दवाखान्यामध्ये उपचार घेत होत्या मात्र नियतीला वेगळेच काही अघटीत होते उपचारादरम्यान सोमवारी पाहटे त्यांची प्राणज्योत मालवली.त्यांच्या पार्थिदेवर अस्थि शहरातील बस स्थानक लगतच्या स्मशानभूमीत दुपारी साडेबारा वाजता अंत्यसंस्कार करण्यात आले छायाताई मोरे प्रेमळ स्वभावाच्या सर्वांना आदराने बोलणाऱ्या अशा कॉलनीमधील महिला होत्या त्यांच्या अंत्यविधीला मोठ्या संख्येने महिला भगिनी सगळे सोयरे व्यापारी व मोरे सरांवर प्रेम करणारा मित्रपरिवार मोठ्या संख्येने उपस्थित होता छायाताई मोरे ह्या आमदार सुरेश आण्णा धस यांचे चुलत बंधू सतीश धस यांच्या सासुबाई होत्या मोरे धस परिरावर छाया ताईच्या जाण्याने जो दुःखाचा डोंगर कोसळला आहे त्यातून सावरण्याची ईश्वर त्यांना ताकद देवो छायाताई यांना तीन मुली व एक मुलगा नातू नातवंडे असा यांचा परिवार आहे



### अण्णाभाऊ साठे जयंतीनिमित्त घेण्यात आलेल्या स्पर्धांचे बक्षीस समारंभ संपन्न

युसूफवडगांव । प्रतिनिधी

केज तालुक्यातील युसूफवडगांव येथे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त जि.प शाळेत विविध शालेय स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.आज त्याचा बक्षीस वितरणाचा कार्यक्रम संपन्न झाला. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंतीनिमित्ताने दरवर्षी प्रमाणे याही वर्षी उत्सव समितीच्या वतीने केंद्रीय जि.प शाळेत विद्यार्थ्यांसाठी वक्तृत्व स्पर्धा,गीत गायन स्पर्धा,रांगोळी स्पर्धा,निबंध स्पर्धा,चित्रकला स्पर्धा व सुंदर हस्ताक्षर अशा विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते.या स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थ्याना उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सन्मान चिन्ह व शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले.यावेळी मन्मथ पाटील,चंद्रकांत भुसारी, अशोक चोपणे,काशीनाथ खरबड,अनिल उजगरे,भैय्या सावंत,ओमकार लामतुरे,राचलिंग पाटील,धिरज इरगट,प्रविण वैरागे,शंकर निशिगंध,ओम वैरागे,पंकज वैरागे,महालिंग खरबड,मुख्याध्यापक शिवहार चोपणेसह,सर्व शिक्षक,शिक्षीका व जयंती उत्सव समितीचे पदाधिकारी उपस्थित होते.

### रंजेगाव येथे विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप

नाथापूर : रंजेगाव ता.जि. बीड येथील शेतकरी पुत्र आणि विद्यार्थ्यांच्या शिक्षणाविषयी तळमळ असणारे श्री. अनंता कचरत आबुज यांनी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा रंजेगाव येथील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप केले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद झळकला.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक श्री. लहाने सर होते. श्री. आबुज यांनी आपल्या भाषणात शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित करत विद्यार्थ्यांना मनापासून अभ्यास करण्याचे आवाहन केले.व ज्या गरजू मुलांना शैक्षणिक साहित्याची गरज आहे अशांना आपण साहित्य देऊ असे आश्वासित केले.त्यांच्या या शैक्षणिक साहित्याच्या वाटपामुळे गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक गरज भागविण्यास मोठी मदत होणार आहे. गावकऱ्यांनी व पालकांनी श्री. आबुज यांच्या उपक्रमाचे कौतुक केले.या वेळी शाळेतील सर्व शिक्षक व गावाकरिवृंद मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

# रानभाज्याचे माणसाच्या आहारात अनन्य साधारण महत्व -आ.सोळंके

## कृषी कार्यालयाच्या राणभाजी मोहोत्सवास शेतकऱ्यांचा उत्स्फूर्तपणे प्रतिसाद

माजलगाव । प्रतिनिधी

रानभाज्याची आपल्या आहारात समावेश केल्यामुळे आपले आरोग्य अबाधित राखले जाते असे प्रतिपादन आमदार प्रकाश सोळंके यांनी पंचायत समिती माजलगाव येथे तालुका कृषी अधिकारी कार्यालय माजलगाव येथे दि १८ ऑगस्ट सोमवार रोजी आयोजित केलेल्या रानभाजी महोत्सव मध्ये केले.

रानभाजी महोत्सव चे उद्घाटन आमदार प्रकाश सोळंके यांच्या हस्ते करण्यात आले.पुढे बोलताना रानभाज्या नैसर्गिकरित्या आपल्या शेतशिवारामध्ये उपलब्ध होत असून त्यावर कसल्याही प्रकारच्या कीटकनाशकांचा वापर केला जात नाही तसेच या रानभाज्यामध्ये विविध प्रकारचे विटामिन्स.खनिजे, प्रथीने



असल्यामुळे आपल्या आरोग्यास लाभदायक असतात या रानबाजासाठी ग्राहक आणि उत्पादक साठी सुविधा उपलब्ध करून दिल्यास अनेकांना फायदा होईल असे सांगितले.कार्यक्रमाचे प्रस्ताविक गणेश बादाडे तालुका कृषी अधिकारी माजलगाव यांनी करताना विविध भाज्यांचे महत्त्व आणि त्यांच्या रेसिपी याविषयी माहिती सांगितली श्रीमती श्रद्धा भवारी उपविभागीय कृषी अधिकारी माजलगाव यांनी आपल्या मनोगत व्यक्त करताना रानभाज्या आणलेल्या शेतकरी,शेतकरी गट,महिला बचत गटांचे अभिनंदन केले.कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती म्हणून प्रशासक तथा गट विकास अधिकारी माजलगाव श्रीमती ज्योत्स्ना मुळीक आणि पंचायत समितीचे माजी उपसभापती मनसबदार, उपस्थित होते यावेळी जागृत खेडकर मंडळ कृषी अधिकारी माजलगाव,दत्तप्रसाद भोसले मंडळ कृषी अधिकारी गंगामसला,गोपीनाथ पवार तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापक माजलगाव अण्णासाहेब जगताप पुरस्कार प्राप्त शेतकरी तसेच कृषी विभागातील सर्व उप कृषी अधिकारी,सहाय्यक कृषी अधिकारी,आत्मा कर्मचारी आणि तालुक्यातील मोठ्या प्रमाणावर शेतकरी,पत्रकार उपस्थित होते यावेळी रानभाजी स्टॉल लावलेल्या शेतकऱ्यांमधून प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक काढून त्यांचे प्रशस्तीपत्र देऊन सत्कार करण्यात आले तसेच सर्व सहभागी महिला बचत गट,शेतकरी यांना उत्स्फूर्त सहभाग घेतल्याबद्दल प्रशस्तीपत्र देऊन गौरवण्यात आले रामबाजी स्टॉलला शहरातील अनेक शाळेचे व महाविद्यालयाच्या विद्यार्थी यांनी भेट देऊन रानभाज्याचे महत्त्व जाणून घेतले या रानभाजी महोत्सव मध्ये जवळपास ४० प्रकारच्या भाज्या उपलब्ध होत्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गौरव बापमारे उप कृषी अधिकारी माजलगाव यांनी केले आभार आतिश चाटे मंडळ कृषी अधिकारी केसापुरी यांनी मानले.

### पत्रकार रानबा गायकवाड यांच्या घराची नासधूस दोन दिवस झाले तरी पोलिसांकडून कारवाई नाही

परळी । प्रतिनिधी

शहरातील सिद्धार्थ नगर येथील पत्रकार रानबा गायकवाड यांच्या घराची गल्लीतील गुंडांनी नासधुस केली आहे.याप्रकरणी दोन दिवस झाले तरी संभाजीनगर पोलिसांकडून आरोपींवर अद्याप कोणतीही कारवाई झाली नसल्याने पोलीस आरोपींना पाठीशी घालत असल्याचा आरोप रानबा गायकवाड यांनी केला आहे.



सिद्धार्थ नगर येथील बौद्ध विहारात समोर पत्रकार रानबा गायकवाड यांचे घर आहे.या घराची दोन दिवसांपूर्वी गल्लीतील गुंडांनी रानबा गायकवाड व त्यांच्या पत्नी यांना शिवीगाळ करत घरावरील पत्रे यांची तोडफोड केली.याप्रकरणी रानबा गायकवाड यांनी संभाजीनगर पोलिसांना माहिती व तक्रार देऊनही अद्याप कोणतीही कारवाई केली नाही. या घटनेतील आरोपींवर यापूर्वीही अनेक गंभीर गुन्हे दाखल आहेत.तसेच बौद्ध विहारात समोर पत्याचा कल्ब चालवून गल्लीत दहशत निर्माण करीत आहे.याप्रकरणी संभाजीनगर पोलिसांनी कारवाई करावी अन्यथा कुटुंबासह संभाजीनगर पोलिस स्टेशन समोर आंदोलनाचा इशारा रानबा गायकवाड यांनी दिला आहे.

## एस.टी. महामंडळात अनियमिततेचा पर्दाफाश

बीड । प्रतिनिधी

एस.टी. महामंडळातील गंभीर गैरव्यवहार आणि अनियमिततेचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. विभागीय कार्यशाळा बीड येथे सहाय्यक यंत्र अभियंता पदावर असलेले श्री. निलेश पवार हे अधिकृतपणे कर्मचारी वर्ग अधिकारी नसतानाही गेल्या अनेक महिन्यांपासून अनधिकृतरीत्या हा पदभार सांभाळत आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, तत्कालीन विभाग नियंत्रक श्री. अजयकुमार हिंमत मोरे यांनी पवार यांना तात्पुरता चार्ज दिला होता. परंतु, सद्यस्थितीत कार्यरत विभाग नियंत्रक सौ. अनुजा दुसाने यांनीदेखील कोणतीही दखल न घेता, पवार यांना सतत हा पदभार सांभाळण्याची परवानगी दिली आहे. परिणामी, पवार हे नियमबाह्य पद्धतीने दोन पदे सांभाळत आहेत एकीकडे सहाय्यक यंत्र अभियंता आणि दुसरीकडे कर्मचारी वर्ग अधिकारी! भ्रष्टाचारासाठी चार्ज कायम? फक्त चार्जचीच नाही तर बदली प्रक्रियेतही संशयास्पद व्यवहार उघड झाले आहेत. सेवाज्येष्ठतेला बगल देत, नव्याने नियुक्त झालेल्या काही कर्मचाऱ्यांची काही महिन्यांतच बदली करून त्यांना इच्छित आगार किंवा विभागीय कार्यालयात नेमणूक करण्यात आली आहे. या कारवाया केवळ पक्षपाती, संशयास्पद आणि भ्रष्टाचाराला पोषक असल्याचा आरोप होत आहे. वंचित बहुजन आघाडीचा तीव्र आक्रोश या सर्व प्रकारांविरोधात वंचित बहुजन आघाडी बीड पश्चिमचे जिल्हाध्यक्ष प्रतीक (अजय) सरवदे यांनी तीव्र आक्रोश व्यक्त केला असून, परिवहन मंत्री, राज्यमंत्री, अतिरिक्त मुख्य सचिव, महाव्यवस्थापक तसेच पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. प्रकाश उर्फ बाळासाहेब आंबेडकर यांच्याकडे तक्रार नोंदवली आहे.सरवदे यांची ठाम मागणी निलेश पवार यांचा अनधिकृत चार्ज तात्काळ काढून घेण्यात यावा, त्यांच्या कार्यकाळातील सर्व कामकाज व बदली प्रकरणांची स्वतंत्र चौकशी समितीकडून तपासणी करण्यात यावी, दोषींवर आवश्यक ती प्रशासकीय व शिस्तभंगात्मक कारवाई करण्यात यावी. शासन व प्रशासनावर दबाव सरवदे यांनी स्पष्ट इशारा दिला आहे की, जर शासनाने तातडीने कारवाई केली नाही तर वंचित बहुजन आघाडी उग्र आंदोलन उभारेल आणि बीड जिल्ह्यातील एस.टी. प्रशासनाला जबाबदार धरले जाईल.

पान ६ वरुन...

### शिवानंद शिवाचार्य महास्वामिजी

पूजा व दररोज शिवपाठ भजन व प्रवचन व गुरु महाराजांच्या मुखातून अमृत उपदेश श्रवण केले. या सर्व कार्यक्रमाला आंध्रप्रदेश,कर्नाटक , तेलंगणा आदी विविध राज्यातून लाखो भाविक भक्त व श्रोत्यांनी श्रीक्षेत्र कपिलधार येथे भरभरून प्रतिसाद दिला व कार्यक्रमाची शोभा वाढवली. बुधवार दि.२० ऑगस्ट २०२५ रोजी ४१ व्या अनुष्ठानाची भक्तिमय वातावरणामध्ये सांगता होणार आहे. यामध्ये भाविक भक्त व महिला भगिनी डोक्यावर कलश घेऊन महाराजांची अश्व रूढ मिरवणूक काढणार आहेत तरी या सुवर्णमयी कार्यक्रमास पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी उपस्थिती लावून कार्यक्रमाची शोभा वाढवावी असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

### बार्शीनाका रेल्वेस्टेशनचे

शासकीय दूध डेरी. महिला रोगणालय. जिल्हा क्रीडांगण आणी जवळपास ९५ टक्के शाळा महाविद्यालय हे बार्शीनाका इमामपुररोड रेल्वे स्टेशनवरून जवळ आहेत तसेच चारो दिशेने नॅशनल हायवे असल्यामुळे बार्शी रेल्वे स्टेशन वर ट्राफिक होणार नाही विशेष म्हणजे बार्शीनाका इमामपुर रेल्वे स्टेशनवर रेल्वेत बोर्डाने यापूर्वीच जमीनी खरेदी करून चार मोठ्या बिल्डिंग तैय्यार केलेले आहेत म्हणूनच एकदम कमी खर्चयात कम खर्चात रेल्वे स्टेशन होईल म्हणून बार्शी नाका इमामपुर रोडवर रेल्वे स्टेशन (रेल्वे थांबा)चे काम त्वरित सुरू करावे अशी नम्र विनंती बार्शी नाका इमामपुर रोड रेल्वे स्टेशन कृती समितीच्या वतीने उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे करण्यात आली असता उपमुख्यमंत्री दादांनी सदर निवेदन लक्षपूर्वक वाचले आहे, यावेळी संपादक गम्मतभाऊ भंडारी यांचे मार्गदर्शन लाभले असुन बार्शीनाका रेल्वे स्टेशन कृती समितीचे कार्य अध्यक्ष खुर्शीद आलम यांच्या नेतृत्वात, गोरख शिंगण,नगरसेवक अमोल पऊड, शेख अखील भाई, शनेश्वर गायकवाड,शेख युनुस भाई, आदी मान्यवर उपस्थित होते.

### विशेष सरकारी वकील

बीड वकील संघाचे अध्यक्ष ॲड. सुभाष पिसुरे आप्पा, उपाध्यक्ष रघुराज देशमुख, सचिव ॲड. सुभाष काळे, तसेच वकील धीरजकुमार कांबळे, योगेश टेकाडे, सय्यद अझीम आणि महिला प्रतिनिधी मनिषा गडकर यांच्यासह शेकडो वकिलांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. सत्कार समारंभात वकिलांनी ॲड. निकम यांच्या कार्याची प्रशंसा करत, राज्यसभेतून न्यायव्यवस्थेच्या प्रलंबित प्रश्नांना आणि वकील हितांच्या मागण्यांना ते योग्य न्याय देतील, असा विश्वास व्यक्त केला. हा कार्यक्रम बीड जिल्ह्यातील वकील समाजासाठी ऐतिहासिक क्षण ठरला असून, ॲड. उज्वल निकम यांच्या सन्मानामुळे उपस्थितांमध्ये उत्साहाचे वातावरण होते.

### घाटनांदुर येथे जय मल्हार

नागरिकांची उपस्थिती होती. यावेळी मा.जि.प.अध्यक्ष शिवाजी सिरसाट, बाळासाहेब देशमुख, सरपंच महेश गारठे, चंदनवाडी गावचे सरपंच ज्ञानेश्वर गित्ते, दत्ता जाधव, गणेश देशमुख, दादा वैद्य, प्रदीप वैद्य, डॉ.श्रीकांत मुंडे,पवन दरगड, महेबूब शेख, गोविंद वैद्य, गोपाळ गाडवे, रंगनाथ गाडवे ,सुरज गीते,संतोष सोनपीर, सलाम कुरेशी, बाबा कुसळे या सर्व दहीहंडी कार्यक्रमाचे आयोजन जय मल्हार गणेश मंडळ घाटनांदुर च्या सर्व सदस्यांच्या वतीने करण्यात आले होते.

### पंचनामे करून नुकसान

करून, सरकार ने नुकसान भरपाई द्या अन्यथा शेतकऱ्यांना घेऊन तीव्र आंदोलन छेडण्यात येईल अश्या आशयाचे पत्रक काढत प्रसिद्धी माध्यमाद्वारे सरकारकडे शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याची हाक काँग्रेस अनु. जाती विभागाचे जिल्हाध्यक्ष दत्ता कांबळे यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली आहे तसेच, शेतकऱ्यांना लवकरात लवकर पंचनामे करून मदत जाहीर केली नाही तर संविधानिक मार्गाने शेतकऱ्यांच्या नुकसान भरपाई साठी आंदोलन छेडण्यात येईल असा इशारा ही सदरील पत्रकाद्वारे दिला आहे.

### बीड शहरातील रस्त्यांचे

विकासासाठी होणार की स्वतःच्या राजकीय फायद्यासाठी, असा थेट सवाल त्यांनी उपस्थित केला आहे. येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत बीडकरांनी या नेत्यांना जागा दाखवावी, असे आवाहनही त्यांनी केले आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी बीडच्या विकासासाठी १०० कोटींचा निधी जाहीर केला आहे. यामध्ये रस्ते, नाले आणि शहर सुशोभीकरणासाठी १० कोटींचा समावेश आहे, असे सांगितले जाते. मात्र, या निधीचा वापर खरोखरच शहराच्या विकासासाठी होणार की, निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय लाभासाठी, याबाबत शफीक भाऊ यांनी शंका उपस्थित केली आहे. ''नगर परिषदेत आतापर्यंत सत्ता भोगली, पण विकास झाला नाही. आता हा निधी स्वतःच्या फायद्यासाठी वापरला जाणार तर नाही ना?'' असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला आहे.

### डॉ.ओमप्रकाश शेटे

निमित्त गोपूजन करण्यात आले.आजच्या तंत्रज्ञानयुक्त आणि स्पर्धात्मक युगात वाचनाची सवय हळूहळू लोप पावताना दिसते. स्मार्टफोन आणि इंटरनेटच्या वर्चस्वामुळे तरुण पिढी मोबाइल स्क्रीनवर अधिक वेळ घालवते. पूर्वी पालक आणि शिक्षक मुलांना पुस्तके वाचण्यास प्रोत्साहित करत, परंतु आता माहिती एका क्लिकवर उपलब्ध असल्याने वाचनाची गोडी कमी होत आहे. तरीही, पुस्तकांचे महत्त्व कधीही कमी होत नाही. पुस्तके ही ज्ञानाची खाण आहे, जी व्यक्तीला विचारांची दिशा आणि प्रेरणा देते. वाचनालये आणि वाचनप्रेमी यासाठी सतत प्रयत्नशील असतात. डॉ.शेटे यांची ''पुस्तक–तुला'' हा उपक्रम केवळ पुस्तकांची देवाणघेवाण नव्हता, तर तो वाचन संस्कृतीला उजाळा देणारा एक संकल्प होता. हा उपक्रम समाजाला वाचनाचे महत्त्व पटवून देत, नव्या पिढीला प्रेरणा देणारा ठरेल.

## राष्ट्रीय आदर्श शिक्षक पुरस्काराने कंकरसिंह टाक यांचा गौरव

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा तालुक्याचे सुप्रसिद्ध कराटे प्रशिक्षक आणि खालसा स्पोर्ट्स अकॅडमीचे संचालक कंकरसिंह टाक तसेच त्यांचे सहकारी शिक्षक राख भागवत यांना क्रीडा क्षेत्रातील उल्लेखनीय योगदाना बद्दल ''राष्ट्रीय आदर्श शिक्षक पुरस्कार'' प्रदान करून सन्मानित करण्यात आले. हा भव्य पुरस्कार वितरण सोहळा रविवार, दि. १७ ऑगस्ट २०२५ रोजी नाशिक (पंचवटी) येथील कालिका मंदिर सभागृहात संपन्न झाला. कार्यक्रमाचे अध्यक्ष अन्नासाहेब पाटील होते, तर लखुजीराव जाधव यांचे तेरावे वंशज शिवाजी राजे जाधव यांच्या शुभहस्ते या पुरस्काराचे वितरण करण्यात आले. सोहळ्यात दुधारे क्रीडा फाउंडेशनचे अध्यक्ष अशोक दुधारे, उपाध्यक्ष आनंद खरे तसेच इतर मान्यवर उपस्थित होते.गेल्या १५ वर्षांपासून खालसा स्पोर्ट्स अकॅडमीमार्फत कंकरसिंह टाक यांनी कराटे खेळाच्या माध्यमातून शेकडो मुला–मुलींना प्रशिक्षण देऊन त्यांच्यातील आत्मविश्वास, शिस्त व सामाजिक



जाणीव वृद्धिंगत केली आहे. कराटेच्या माध्यमातून त्यांनी विद्यार्थ्यांना स्वरक्षण, समाजरक्षण, पारिवारिक मूल्यांचे जतन आणि देशसेवेची प्रेरणा दिली आहे. परिणामी तालुका, जिल्हा, विभाग, राज्य तसेच राष्ट्रीय स्तरावर अकॅडमीतील खेळाडूंनी उत्कृष्ट कामगिरी करत अनेक पदके पटकावली आहेत.महिलांवर वाढत्या अत्याचारांच्या पार्श्वभूमीवर कंकरसिंह टाक यांनी विशेष उपक्रम राबवून महिलांना व मुलींना आत्मरक्षेचे प्रशिक्षण दिले. त्यांच्या या उपक्रमामुळे अनेक मुलींमध्ये धाडस आणि सुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे. क्रीडा क्षेत्रातील योगदानाबरोबरच त्यांनी शालेय शिक्षणापासून वंचित राहणाऱ्या विद्यार्थ्यांना सहकार्य करत साहित्य वाटप, सामाजिक सेवा उपक्रम, तसेच विविध जनजागृती मोहिमा राबवल्या आहेत.सदर पुरस्कारामध्ये शाल, पुष्पहार, सन्मानचिन्ह व मानपत्र अशा सन्माननीय स्वरूपात गौरव करण्यात आला.या सन्मानामुळे पाटोदा तालुक्याच्या क्रीडा क्षेत्राचा गौरव उंचावला असून, कंकरसिंह टाक यांच्या कार्याचे सर्वत्र कौतुक होत आहे. स्थानिकांसह सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रातून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

## मानसिक आरोग्य जनजागृतीसोबत शिक्षक प्रशिक्षण आणि गुणवंतांचा गौरव!

माजलगाव । प्रतिनिधी

अभिनव शैक्षणिक आणि वैविध्यपूर्ण उपक्रमासाठी ओळखल्या जाणाऱ्या गुरुकृपा ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटच्या वतीने ''युअर मेंटल ह्रेल्थ मॅटर'' या उपक्रमाचे आयोजन केले होते. यात मानसिक आरोग्य जनजागृती कार्यक्रम व शिक्षकांसाठी विद्यार्थ्यांची मानसिक स्थिती कशी हाताळावी याचे विशेष प्रशिक्षण देण्यात आले तसेच गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कारही करण्यात आला.



या कार्यक्रमाचे प्रास्ताविक शरीर रचना विभागाचे विभाग प्रमुख डॉ. अतुल बिर्ला यांनी केले. तसेच कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी जिल्हा रुग्णालय, बीड येथील सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ डॉ. अशोक मते यांनी विद्यार्थ्यांशी थेट संवाद साधत ताण–तणाव नियंत्रण, सकारात्मक विचारसरणी व मानसिक आरोग्याचे महत्त्व यावर प्रकाश टाकत चर्चा केली आणि शिक्षकांसाठी खास प्रशिक्षण सत्र घेत मौलिक मार्गदर्शन केले. गुरुकृपा ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्स संस्थेचे अध्यक्ष डॉ. यशवंत राजेभोसले यांनीही या कार्यक्रमात उपस्थित राहून विद्यार्थ्यांना व शिक्षकांना मानसिक स्वास्थ्य टिकविण्यासाठी आवश्यक जीवनमूल्ये व प्रेरणादायी विचार दिले. कार्यक्रमाच्या द्वितीय सत्रात बी.ए.एम.एस. प्रथम वर्षातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार प्रमाणपत्रे व स्मृतिचिन्ह देऊन करण्यात आला.हा प्रेरणादायी क्रियाशील उपक्रम गुरुकृपा ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्सच्या सर्व शैक्षणिक विभागांच्या संयुक्त विद्यमाने आणि सहकार्याने यशस्वीरीत्या पार पडला. या उपक्रमासाठी फार्मसी महाविद्यालयाचे प्राचार्य श्री. अमित बिंदू, फिजिओथेरपी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मकेश बाबू, गुरुमाऊली नर्सिंग महाविद्यालयाच्या प्राध्यापिका पूनम खानापूरकर यासोबत इतर मान्यवरांची उपस्थिती लाभली.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यार्थिनी कु. सृष्टी बोर्डे व कु. सायली मुंडे यांनी केले तर आभार प्रदर्शन कु. सानिका अवचार व चि.ओम सावंत यांनी केले.

# मोदीचे विकास मॉडेल श्रमिकांसाठी बिनकामी

## शेतमजूर युनियनचे राष्ट्रीय महासचिव बी व्यंकट, महाराष्ट्र राज्य शेतमजूर युनियनचे १२ वे राज्यअधिवेशन माजलगावमध्ये सुरू

माजलगाव । प्रतिनिधी

पंतप्रधान मोदींचे भांडवली विकास मॉडल ग्रामीण श्रमिकांसाठी बिन कामाचे आहे, असे प्रतिपादन अखिल भारतीय शेतमजूर युनियन चे राष्ट्रीय महासचिव कॉम्रेड बी वेंकट यांनी केले. महाराष्ट्र राज्य शेतमजूर युनियनच्या बाराव्या राज्य अधिवेशनाची सुरुवात माजलगाव येथे जाहीर सभेने झाली. त्यावेळी ते बोलत होते. या जाहीर सभेसाठी शेतकरी नेते अजित नवले, शेतमजूर युनियन च्या केंद्रीय कमिटी सदस्य सरिता शर्मा, किसान सभेचे अजय बुरांडे यांनीही मार्गदर्शन केले.

महाराष्ट्र राज्य शेतमजूर युनियन लाल बावटा या संघटनेचे बारावे राज्य अधिवेशन १७ ते १९ ऑगस्ट दरम्यान माजलगाव येथे संपन्न होत आहे. या अधिवेशनानिमित्त माजलगाव शहरांमधून भव्य





मिरवणूक झाली. मिरवणुकीचे रूपांतर शहरातील वैष्णवी मंगल कार्यालयामध्ये जाहीर सभेमध्ये झाले. सभेच्या अध्यक्षस्थानी संघटनेचे राज्य अध्यक्ष कॉ. मारुती खंदारे हे होते. यावेळी बोलताना युनियनचे महासचिव बी वेंकट पुढे म्हणाले की, देशामध्ये दोन प्रकारचे विकास मॉडेल आहेत. एक केरळ राज्य सरकार चालवते त्याप्रमाणे श्रमिकांच्या बाजूचे विकास मॉडेल व दुसरे मोदीचे भांडवलदारांच्या बाजूचे विकास मॉडेल.केंद्र सरकारचे हे विकास मॉडल ग्रामीण श्रमिकांसाठी बिनकामाचे आहे. देशामध्ये मोदी सरकार सत्तेवर आल्यापासून महागाई वाढली आहे,रोजगार घटला आहे,जाती व धार्मिक ध्रुवीकरण वाढले आहे, श्रमिकांचा अधिकार असलेल्या जमिनी काढून घेऊन भांडवलदारांच्या नफ्यासाठी वापरल्या जात आहेत. देशातील साधनसंपत्तीची वारे माप लूट करून भांडवलदार नफेखोरी करत आहेत.उलट केरळमध्ये राज्य सरकार ग्रामीण मजुरांना सातशे रुपये रोजंदारी देते, घरकुलासाठी सात लाख रुपये मिळतात, सरकारी शाळा व आरोग्य मजबूत आहेत. मोदीचे विकास मॉडेल भांडवलदारांचे भले करणारे असल्याने ग्रामीण श्रमिकांसाठी निरुपयोगी आहे. यावेळी सभेमध्ये बोलताना शेतकरी नेते अजित नवले म्हणाले की राज्य सरकारने निवडणुकीपूर्वी आश्वासन दिल्याप्रमाणे शेतकरी शेतमजुरांचे सर्व कर्ज माफ करून सातबारा कोरा केला पाहिजे. राज्य सरकारला आपल्या आश्वासनाचा विसर पडला आहे. शेतकरी शेतमजूर आपल्या मागण्यांसाठी जी आंदोलने करतात ती आंदोलने दडपून टाकण्यासाठी सरकारला विशेष जलसुरक्षा कायद्यासारखे काळे कायदे करावे लागत आहेत. सरकारच्या दडपशाही विरोधात श्रमिक जनतेने आपल्या अधिकाराचा संघर्ष अधिक तीव्र करावा असे आवाहन त्यांनी केले. यावेळी मंचावर शेतमजूर युनियनचे केंद्रीय कमिटी सदस्य प्रकाश चौधरी, नथूभाऊ साळवे,विनोद गोविंदवार,सय्यद रजाक,दत्ता डाके, स्वागताध्यक्ष अशोक सोळंके,हे उपस्थित होते. अधिवेशनाची मिरवणूक यशस्वी करण्यासाठी शेतमजूर युनियनचे जिल्हाध्यक्ष सुदाम शिंदे,शिवाजी कुरे, बळीराम भुंबे, रत्नाकर गोळेकर, उषा अवसे,बब्रुाम गरड,प्रकाश उजगरे,पंडित शिंदे, संगीता रुमाले,रेखा शिंदे,विष्णू पोटभरे यांनी परिश्रम घेतले.






# सातबाऱ्यावरची चुकीची नोंद लगेच दुरुस्त करा; नाहीतर मोठं संकट येणार !

पुणे: महाराष्ट्रात जमिनीशी संबंधित प्रत्येक व्यवहारात सातबारा उताऱ्याला खूप महत्त्व आहे.. जमीन विक्री, खरेदी, कर्ज किंवा वारसा यांसाठी या कागदपत्रावर नोंदी स्पष्ट असणे गरजेचे आहे. पण अनेकदा फेरफार करताना चुकीच्या किंवा खोट्या नोंदी होतात आणि त्यामुळे शेतकरी मोठ्या अडचणीत सापडतात.

फेरफार नोंद म्हणजे जमिनीच्या मालकीत किंवा हक्कांमध्ये झालेल्या बदलाची अधिकृत नोंद. ही नोंद महसूल विभागातील तलाठी किंवा संबंधित अधिकारी करतात. पण कधीकधी चुकून वेगळ्याच व्यक्तीचं नाव नोंदवलं जातं, मृत व्यक्तीच्या नावे हक्क राहतो किंवा अनधिकृत वारसाचं नाव टाकलं जातं. अशा चुका झाल्या तर शेतकऱ्यांना कर्ज मिळत नाही, विक्री-खरेदीचे व्यवहार अडकतात आणि जमिनीवरील हक्क धोक्यात येतो.




कायद्याची तरतूद काय सांगते? कलम १५० (६), महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ : महसूल अधिकारी किंवा उपविभागीय अधिकारी यांच्याकडे अर्ज करून चुकीची नोंद दुरुस्ती करता येते. अर्जासोबत खरी मालकी दाखवणारे पुरावे द्यावे लागतात. अधिकारी पडताळणी करून चुकीची नोंद रद्द करू शकतात किंवा दुरुस्ती करू शकतात. कलम २५१ : जर कुणी खोटी माहिती देऊन जमिनीवर हक्क मिळवण्याचा प्रयत्न केला असेल, तर त्याच्यावर गुन्हा दाखल होऊ शकतो.

अपील करण्याची मुदत किती?

साधारणतः फेरफार नोंदीवर अपील करण्यासाठी ७ ते ९० दिवसांची मुदत असते. पण अनेक वेळा शेतकऱ्यांना ही चूक उशिरा लक्षात येते. जर मुदत संपली असेल तरी संबंधित महसूल अधिकाऱ्यांकडे विशेष कारण दाखवून अर्ज करता येतो. अधिकारी कारण योग्य असल्यास जुन्या नोंदीचे पुनर्विलोकन करू शकतात. मात्र, यासाठी ठोस पुरावे आवश्यक असतात.

शेतकऱ्यांनी काय काळजी घ्यावी?

कायदेतज्ज्ञ सांगतात की चुकीची नोंद जास्त काळ कायम राहिली तर ती रद्द करणे कठीण होऊन बसते. म्हणून शेतकऱ्यांनी सातबारा उतारा वेळोवेळी तपासावा आणि जर चूक दिसली तर तात्काळ कारवाई करावी. सातबारा उताऱ्यावरची चुकीची फेरफार नोंद शेतकऱ्यांच्या हक्कांवर मोठा परिणाम करू शकते. त्यामुळे वेळ न घालवता पुरावे गोळा करून महसूल अधिकाऱ्यांकडे किंवा न्यायालयात दाद मागणं आवश्यक आहे. योग्यवेळी केलेली कारवाईच आपला जमिनीवरील हक्क सुरक्षित ठेवू शकते.

# सांगली जिल्हा बँक 'एआय'साठी देणार अनुदान



जिल्ह्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञान वापरण्यास प्रोत्साहन देण्यासाठी जिल्हा बँकेच्या वतीने ए-आय तंत्रज्ञानासाठी (कृत्रिम बुद्धिमत्ता) ९ हजार रुपये अनुदान देण्यात येणार असल्याची घोषणा बँकेचे अध्यक्ष मानसिंगराव नाईक यांनी केली.

येथील धनंजय गार्डन येथे सांगली जिल्हा मध्यवर्ती बँकेची ९८ वी वार्षिक सर्वसाधारण सभा अध्यक्ष मानसिंगराव नाईक यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. या वेळी बँकेच्या उपाध्यक्ष जयश्री पाटील, संचालक मोहनराव कदम, संग्रामसिंह देशमुख, महेंद्र लाड, सुरेश पाटील, अमोल बाबर, तानाजी पाटील, वैभव शिंदे, राहुल महाडीक यांच्यासह सर्व संचालक, मुख्य कार्यकारी अधिकारी शिवाजीराव वाघ आदी उपस्थित होते. याप्रसंगी यंदा १०० टक्के वसुली केलेल्या सोसायटीचे अध्यक्ष, उपाध्यक्ष आणि सचिवांचा सत्कार या वेळी करण्यात आला. अध्यक्ष नाईक यांनी सभासदांनी विचारलेल्या प्रश्नांना सविस्तर उत्तर देताना म्हणाले, जिल्हा मध्यवर्ती बँक ही राज्यातील एक नंबरची बँक असून शेतकऱ्यांच्या हिताचे निर्णय घेत आहे. शेतकऱ्यांना आर्थिक सक्षम करण्यासाठी प्रयत्नशील !आहे. थकबाकीदार शेतकरी व सभासद संस्था यांना दिलासा देत पुन्हा एकदा बँकेच्या वतीने ओटीएस योजना राबविणार आहे. ते म्हणाले, की शेतीचे उत्पादन वाढविण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला जात आहे.

ए-आय तंत्रज्ञानासाठी २५ हजारांचा खर्च येतो. त्यासाठी वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूटकडून ९ हजार २५० रुपये, साखर कारखाने ६ हजार ७५० रुपये देणार आहे. शेतकऱ्यांना ९ हजार रुपये हिश्श्याची रक्कम भरावी लागणार आहे. शेतकरी हिश्श्याचे ९ हजारांचे अनुदान न परत फेडीसाठी देणार आहे. थकबाकीदार शेतकरी व सभासद संस्था यांना दिलासा देत पुन्हा एकदा बँकेच्या वतीने ओटीएस योजना राबविणार असल्याचेही त्यांनी जाहीर केले.

# सरकी ढेप अन् खाद्यतेलाचे बाजारभाव वाढले !

## साखरेच्या दरात देखील वाढ होण्याची शक्यता

जालना : जालना बाजारपेठेत गेल्या दोन-तीन दिवसांपासून सतत पाऊस सुरू असल्यामुळे गिऱ्हाइक कमी झाले आहेत. सरकी ढेपेने भावाचा उच्चांक गाठला आहे. खाद्यतेलामध्ये पुन्हा सरकार आयात शुल्क लावणार, अशी बाजारात मोठ्या प्रमाणावर चर्चा सुरू आहे. सोन्या-चांदीमध्येही काही प्रमाणात घसरण झाल्याचे दिसून येत आहे.

सरकी बाजारात नवा उच्चांक निर्माण झाला असून, साठवणूक कमी असल्याने बाजारपेठेत भाव प्रतिक्विंटल ५० रुपयांनी वाढले आहेत. सध्या सरकीचा भाव ३८५० रुपये प्रतिक्विंटल आहे. दुग्ध जनावरांसाठी लागणारी उत्पादन सरकीढेप उत्पादन व स्टॉक कमी असल्याने तसेच नवीन कापसाचे येण्यासाठी कालावधी लागणार असल्याने सरकी ढेपेच्या भावात मोठी तेजी आली आहे. कोणत्याही व्यापाऱ्याकडे मोठा स्टॉक शिल्लक नसल्याने येत्या काळातही यामध्ये तेजी



राहण्याचे संकेत दिले जात आहेत. पुढील एका महिन्यापर्यंत तरी यातील तेजी कमी होण्याची शक्यता दिसून येत नाही. सध्या सरकी ढेपेचे भाव ३८५० ते ३९५० रुपये प्रतिक्विंटलपर्यंत जाऊन पोहोचले आहेत. दुग्धजनावरांना लागणारे पशुखाद्याचे भाव वधारल्यामुळे दुग्धव्यावसायिक अडचणीत सापडले आहेत. गेल्या काही दिवसांपासून सोयाबीनच्या दरात झालेल्या वाढीमुळे शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण आहे.. सध्या सोयाबीन ४७०० ते ४८०० रुपयांपर्यंत पोहोचले आहेत. येत्या काही दिवसांत साखरेमध्ये २० ते २५ रुपये क्विंटलमागे वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही. साखरेचे सध्या भाव ४१०० ते ४३५० रुपये प्रतिक्विंटल आहे. यामध्ये आणखी वाढ होण्याची शक्यता आहेण

तेलांमध्ये तेजीची शक्यता

केंद्र सरकार पाम, सोया व सूर्यफुल तेलांवर आयात शुल्क वाढवण्याची तयारीत आहे, अशी बाजारात मोठ्या प्रमाणात चर्चा सुरू आहे. यामुळे येत्या काही दिवसांत सोया, पाम व सूर्यफुल तेलांमध्ये तेजीची शक्यता आहे.

# कांदा अनुदानाचा मार्ग मोकळा; त्या शेतकऱ्यांना ५२ लाख ७१ हजार ६४४ रुपयांचे कांदा अनुदान अखेर मंजूर

पुणे : शासनाने दोन वर्षांपूर्वी कांदा उत्पादक शेतकऱ्यांना प्रतिक्विंटल ३५० रुपये अनुदान जाहीर केले होते. मात्र पात्र असूनही तांत्रिक अडचणीमुळे अनेक शेतकरी या अनुदानापासून वंचित होते. दरम्यान त्याबाबत केलेल्या पाठपुराव्याला यश मिळाले आहे.

शासनाने दोन वर्षांपूर्वी कांदा उत्पादक शेतकऱ्यांना प्रतिक्विंटल ३५० रुपये अनुदान जाहीर केले होते. मात्र पात्र असूनही तांत्रिक अडचणीमुळे अनेक शेतकरी या अनुदानापासून वंचित होते. दरम्यान त्याबाबत केलेल्या पाठपुराव्याला यश मिळाले आहे. शासनाने दोन वर्षांपूर्वी कांदा उत्पादक शेतकऱ्यांना प्रतिक्विंटल ३५० रुपये अनुदान जाहीर केले होते. मात्र, पात्र असूनही तांत्रिक अडचणीमुळे अहिल्यानगर जिल्ह्याच्या कोपरगाव तालुक्यातील अनेक शेतकरी या अनुदानापासून वंचित होते. त्याबाबत केलेल्या पाठपुराव्याला यश मिळाले असून, शासनाकडून कोपरगाव तालुक्यातील कांदा उत्पादक शेतकऱ्यांना ५२ लाख ७१ हजार ६४४ रुपयांचे अनुदान मंजूर करण्यात आले आहे. कृषी उत्पन्न बाजार समिती, खासगी बाजार समिती व नाफेडला १ फेब्रुवारी ते ३१ मार्च २०२३ या कालावधीत लाल कांदा विक्री केलेल्या शेतकऱ्यांना प्रती शेतकरी ३५० रुपये प्रतिक्विंटल याप्रमाणे अनुदान मंजूर करण्याचा निर्णय शासनाने घेतला होता; परंतु काही तांत्रिक अडचणी व कागदपत्रांची अपूर्तता यामुळे शेतकऱ्यांना अनुदान मिळाले नव्हते. आमदार आशुतोष काळे यांनी मतदारसंघातील कांदा उत्पादक शेतकऱ्यांना अनुदान मिळावे, यासाठी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांना भेटून लेखी निवेदन दिले होते. शासनाने कोपरगाव तालुक्यातील शेतकऱ्यांना दिलासा दिला असून २१० शेतकऱ्यांना ५२ लाख ७१ हजार ६४४ रुपयांचे अनुदान मंजूर करण्यात आले आहे.

# मुरघास निर्मिती तंत्रज्ञान

आपल्या देशात मागील काही वर्षांपासून पावसाच्या अनिश्चित प्रमाणामुळे चाराटंचाई निर्माण झाली आहे. या दुष्काळी परिस्थितीत चारा छावण्यांची उभारणी करण्यात आली. परंतु अशा प्रकारच्या छावण्या हा काही कायमस्वरूपी उपाय होऊ शकत नाही. त्यासाठी हिरवा चारा वर्षभर साठविण्याचे नियोजन म्हणजेच मुरघास निर्मिती हा एकमेव पर्याय आहे. दूध उत्पादक शेतकरी वर्षभर पौष्टिक हिरवा चारा जनावरांना उपलब्ध करून देऊ शकत नाही.

म्हणून पाऊस पडल्यावर जे पहिले पीक तयार होते, म्हणजेच ज्या वेळी मुबलक प्रमाणात हिरवा चारा उपलब्ध असतो, त्याच वेळी त्याचा मुरघास बनवून दीर्घ काळ साठवुनिकीची सोय करणे फायदेशीर असते. आणि हे काम अतिशय कमी खर्चात करता येऊ शकते.

आधुनिक पद्धतीच्या गोठ्याला जर आधुनिक पद्धतीचं चारा नियोजन म्हणजे मुरघास निर्मितीची जोड दिली तर, सोने पे सुहागा म्हणत तुमचा दूध व्यवसाय वाऱ्याच्या वेगाने नफा कमविण्याकडे वाटचाल करू लागेल. आणि हे कमीत कमी कष्टात जास्त नफा देणारे तंत्रज्ञान आहे.

मुरघाससाठी याचा वापर : मुरघास बनविण्यासाठी मका, ज्वारी, बाजरी, व काही गवती चारा पिके वापरली जातात. यामध्ये मका या पिकाचा सर्वात जास्त वापर जगभरात केला



जातो. मक्याचा मुरघास अतिशय चांगला होतो असा अनुभव आहे. मुरघासासाठी चिकातील मका व फुलोऱ्यातील ज्वारीचा वापर हमखास केला जातो. याबरोबरच ल्युसर्न सारखे पीकही एकत्र करून मुरघास बनविता येतो.

उन्हाळ्यातही फायदा : मुरघासामुळे वर्षभराच्या हिरव्या चाऱ्याचे नियोजन आगाऊ, पावसाळा असतानाच करता येते. उन्हाळ्यातही जनावरांना हिरवा आणि पौष्टिक उपलब्ध करून देण्याची कमाल साधता येते. रोज शेतात जाऊन वैरण कापून आणण्याचे कष्ट वाचत तोच वेळ शेतकरी इतर नफेशीर गोष्टींसाठी देऊ शकत. वर्षभर चांगल्या प्रतीचा एकसारखा चारा मिळत राहिल्याने जनावरांमधील पोटाचे आजार कमी हो आरोग्य वाढते. चाऱ्याच्या प्रतीमध्ये पारंपरिक पद्ध पावसाळा आला कि हिरवागार आणि उन्हाळ्यात कडबा, सुकलेले गवत यामुळे जनावरांचे आरोग्य बिघडते आणि दूध उत्पादनावर त्याचा विपरीत परिणाम होतो. कमी जमीन असणारा दूध उत्पादक शेतकरीसुद्धा मुरघास केल्यावर जास्त गाईंचा आरामशीर सांभाळ शकतो, ते देखील चाऱ्यावरील खर्चाची पर्वा न करता.

मुरघासची अशी आहे प्रक्रिया : मुरघास बनविताना चारा पिकातील पाण्याचे प्रमाण ६० ते ६५ टक्के असावे. त्यापक्षा जास्त पाणी झाल्यास नुकसान होऊ नये म्हणून पीक कापणी नंतर थोड्यावेळ साठी चारा सुकू द्यावा. त्यानंतर कुट्टी मशीन च्या साह्याने चाऱ्याचे एक-दोन इंच लांबीचे तुकडे करावेत. कुट्टी केल्यानंतर शक्यतो ती एका जागेवर साठवून ना ठेवता त्वरित बॅगेत, खड्ड्यात किंवा बांधकाम केलेल्या जागी आणून टाकावी. कुट्टी टाकल्यानंतर ती पसरवावी. धुमश्याने किंवा पायाने अथवा ट्रॅक्टरने तुडवावी. यामुळे त्यातील हवा बाहेर निघून जाते. व कुट्टी दाबून बसते. कडांवरची कुट्टी विशेषतः चांगली दाबून घ्यावी.




## महत्वाच्या घटना

२९५ : २९५ ई.पूर्व: प्रेम, सौंदर्य आणि प्रजनन यांची रोमन देवी व्हीनस चे पहिले मंदिर पूर्ण झाले.
१८५६ : गेल बॉर्डन या शास्त्रज्ञाला दुधाच्या शीतकरण प्रक्रियेचे पेटंट मिळाले.
१९०९ : इंडियानापॉलिस मोटर स्पीडवे येथे मोटारींची पहिली शर्यत झाली.
१९१९ : अफगाणिस्तानला (युनायटेड किंगडमपासुन) स्वातंत्र्य मिळाले.
१९४५ : हो ची मिन्ह व्हिएतनामच्या सत्तेवर आले.
१९६४ : केप कॅनॅवरल येथून डेल्टा डी २५ या प्रक्षेपण वाहनाने सिंकॉम३ हा पहिला जिओस्टेशनरी कम्युनिकेशन उपग्रह प्रक्षेपित करण्यात आला.
१९७३ : फ्रांस देशाने आण्विक चाचणी केली.
१९९१ : सोविएत संघाच्या राष्ट्राध्यक्ष मिखाईल गोर्बाचेव्हला फोरोस येथे सुटीवर असताना नजरकैदेत घातले गेले.
१९९९ : बेलग्रेड, युगोस्लाव्हिया येथे हजारो सर्बियन लोकांनी राष्ट्राध्यक्ष स्लोबोदान मिलोसेव्हिच यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी आंदोलन केले.

## जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८७१ : ऑर्व्हिल राईट आपला भाऊ विल्बर राईट याच्यासह इंजिनाच्या विमानाचा शोध लावणारे अमेरिकन अभियंते (मृत्यू: ३० जानेवारी १९४८)
१८७८ : फिलिपाईन्सचे राष्ट्राध्यक्ष मनुएल क्वेझोन यांचा जन्म.
१८८३ : पोर्तुगालचे राष्ट्राध्यक्ष जोसेमेंडेस काबेसादास यांचा जन्म.
१८८३ : चॅनेल कंपनी चे संस्थापिका कोको चॅनेल यांचा जन्म. (मृत्यू: १० जानेवारी १९७१)
१८८६ : मोरेश्वर वासुदेव तथा नरकेसरी अभ्यंकर स्वातंत्र्यसैनिक, टिळकांच्या विचारसरणीचे मध्य प्रांताचे कॉंग्रेस नेते, वकील (मृत्यू: २ जानेवारी १९३५)
१८८७ : भारतीय वकील आणि राजकारणी एस. सत्यमूर्ति यांचा जन्म. (मृत्यू: २८ मार्च १९४३)
१९०३ : गंगाधर देवराव खानोलकर लेखक व चरित्रकार, 'अर्वाचीन मराठी वाङ्मय सेवक' या कोशाचे सात खंड त्यांनी प्रकाशित केले. (मृत्यू: ३० सप्टेंबर १९९२)
१९०७ : सरदार स्वर्ण सिंग केन्द्रीय मंत्री (मृत्यू: ३० आक्टोबर १९९४)
१९०७ : भारतीय इतिहासकार, लेखक, आणि विद्वान हजारी प्रसाद द्विवेदी यांचा जन्म. (मृत्यू: १९ मे १९७९)
१९०८ : पद्मभूषण पुरस्कार तसचं, संगीत नाटक अकादमी पुरस्कार सन्मानित प्रसिद्ध भारतीय शास्त्रीय ठुमरी गायक उस्ताद अब्दुल रशीद खान यांचा जन्मदिन.
१९११ : प्रसिद्ध भारतीय कवी, कथाकार, आणि एकांकीकार आरसी प्रसाद सिंह यांचा जन्मदिन.
१९१३ : भारतीय-इंग्लिश सैनिक व लेखक पीटर केम्प यांचा जन्म. (मृत्यू: ३० ऑक्टोबर १९९३)
१९१८ : शंकरदयाळ शर्मा भारताचे ९ वे राष्ट्रपती व ८ वे उपराष्ट्रपती (मृत्यू: २६ डिसेंबर १९९९)
१९२१ : स्टार ट्रेक कथानकाचे निर्माते जीन रॉडेनबेरी यांचा जन्म.
१९२२ : मराठी गायक बबनराव नावडीकर यांचा जन्म.
१९२८ : प्रसिद्ध भारतीय हिंदी भाषिक लेखक,कादंबरीकार, लघुकथा लेखक, व टीकाकार प्राध्यापक शिवप्रसाद सिंह यांचा जन्मदिन.
१९४६ : बिल क्लिंटन अमेरिकेचे ४६ वे राष्ट्राध्यक्ष
१९५० : पद्मश्री पुरस्कार सन्मानित इन्फोसिस फाऊंडेशनच्या अध्यक्ष, व्यावसायिक भारतीय अभियांत्रिकी शिक्षिका, आणि कन्नड व इंग्रजी भाषिक लेखक सुधा मूर्ती यांचा जन्मदिन.
१९६७ : भारतीय आध्यात्मिक नेते खांड्रो रिनपोछे यांचा जन्म.

## मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१४ १४ ई.पुर्व : रोमन सम्राट ऑगस्टस सीझर यांचे निधन.
१४९३ : पवित्र रोमन सम्राट फ्रेडरिक (तिसरा) यांचे निधन.
१६६२ : ब्लेझ पास्कल फ्रेन्च गणितज्ञ आणि तत्त्वज्ञ (जन्म: १९ जून १६२३)
१७५७ : ब्रिटीश कालीन भारतात इंग्रज सरकारच्या इस्ट इंडिया कंपनीने कलकत्ता येथे एक रुपयाची नाणी तयार केली.
१९०६ : ब्रिटीश कालीन भारतातील बॉम्बे हायकोर्टाचे बॅरिस्टर म्हणून सराव करणारे पहिले भारतीय व्यक्ती तसचं, भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसचे तिसरे अध्यक्ष व पहिले मुस्लीम अध्यक्ष बद्रुद्दीन तैबजी यांचे निधन. (जन्म: १९ जानेवारी १९०६)
१९४७ : विनायक दामोदर कर्नाटकी ऊर्फ 'मास्टर विनायक' अभिनेते, दिग्दर्शक व निर्माते. त्यांनी २२ चित्रपटातून भूमिका केल्या तर २९ चित्रपट दिग्दर्शित केले. (जन्म: १९ जानेवारी १९०६)
१९५४ : इटलीचे पंतप्रधान ऍल्सिदेदि गॅस्पेरी यांचे निधन.
१९४७ : अभिनेते, दिग्दर्शक आणि निर्माते मास्टर विनायक यांचे निधन. (जन्म: २९ जानेवारी १९०६)
१९७५ : डॉ. विनायक विश्वनाथ तथा 'अप्पासाहेब' पेंडसे शिक्षणतज्ञ, देशभक्त, तत्त्वज्ञ, कुशल संघटक, लेखक, पत्रकार आणि 'ज्ञानप्रबोधिनीचे संस्थापक (जन्म: १७ ऑगस्ट १९१६)
१९८३ : भारतीय शिक्षणतज्ञ, देशभक्त, कुशल संघटक, लेखक, पत्रकार व राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सदस्य डॉ. विनायक विश्वनाथ उर्फ 'अप्पासाहेब' पेंडसे यांचे
१९९० : रा. के. लेले पत्रकार, संशोधक आणि मराठी वृत्तपत्रांच्या इतिहासाचे लेखक (जन्म:)
१९९३ : उत्पल दत्त रंगभूमी आणि चित्रपट या दोन्ही माध्यमात आपला ठसा उमटवणारे कलाकार (जन्म: २९ मार्च १९२९)
१९९३ : य. द. लोकुरकर निर्भिड पत्रकार (जन्म:)
२००० : भारतीय कवी, लेखक, आणि शिक्षक बिनेंश्वर ब्रह्म यांचे निधन. (जन्म: २८ फेब्रुवारी १९४८)
२०१३ : न्युझीलंड येथील प्रसिद्ध हिंदी साहित्यकार, भाषा विज्ञानी, व्याकरणकार तसचं, ऑक्सफोर्ड या हिंदी-इंग्रजी शब्दकोशाचे संपादक रोनाल्ड स्टुअर्ट मेक्ग्रेगॉर यांचे निधन.
२०१५ : भारतीय कार्यकर्ते आणि राजकारणी सनत मेहता यांचे निधन.

# शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी शिक्षकांच्या बदल्या रद्द करण्याची ग्रामस्थांची मागणी

## लिंबागणेशकर पालकांचा आक्रमक पवित्रा

लिंबागणेश । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील लिंबागणेश येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेत संवर्ग १ ते ४ मधील तब्बल ५ पैकी ४ शिक्षकांच्या प्रशासकीय बदल्या झाल्या असून या निर्णयाला ग्रामस्थांचा तीव्र विरोध आहे. अचानक झालेल्या या बदल्यांमुळे मुलांचे शैक्षणिक नुकसान होणार असल्याने ग्रामस्थांनी बदल्या तात्काळ रद्द करण्याचे निवेदन शिक्षणमंत्री दादा भुसे, खा. बजरंग सोनावणे, आ. संदिप क्षीरसागर तसेच जिल्हाधिकारी आणि मुख्य कार्यकारी अधिकारी बीड यांना सादर केले आहे. बदल्या रद्द न झाल्यास पालक रस्त्यावर उतरून आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे.

आज (दि. १८) सकाळी ग्रामपंचायत कार्यालयात तसेच शाळेत पालक व ग्रामस्थांची तातडीची बैठक झाली. या बैठकीत ग्रामपंचायत व शालेय व्यवस्थापन समितीने ठराव मंजूर केला असून, त्यासह पालकांच्या स्वाक्षरीचे पत्र जिल्हा प्रशासन व लोकप्रतिनिधींना पाठवण्यात आले आहे. या बैठकीस शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष सुधीर वाणी, पत्रकार हरिओम क्षीरसागर, लेनाजी




गायकवाड, अँड. गणेश वाणी, विक्रांत वाणी, दिनेश जाधव, संतोष भोसले, अशोक वाणी, रामदास मुळे, अभिजित गायकवाड, चेतन कानिटकर, तुकाराम गायकवाड, अशोक थोरात, मंगेश जाधव, आनंद बारगजे, संदिप मुळे आदी पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. लिंबागणेश शाळेत इयत्ता १ ते ४ पर्यंत सुमारे १२५ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. मुख्याध्यापक आबासाहेब हांगे व शिक्षक अमर पुरी, संदिपान आगाम, भरत चौरे, माधुरी कुलकर्णी यांच्या प्रयत्नांमुळे या शाळेची गुणवत्ता लक्षणीयरीत्या वाढली आहे. इतकेच नव्हे तर गावातील इंग्लिश स्कूलमध्ये शिकणारी मुलेही पुन्हा जिल्हा परिषद शाळेत दाखल झाली आहेत. तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी अजित पवार आणि शिक्षणाधिकारी प्राथमिक कुलकर्णी यांनी प्रत्यक्ष शाळेला भेट देऊन विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेचे कौतुक केले होते. अशा परिस्थितीत या शिक्षकांची बदली म्हणजे मुलांच्या भवितव्याशी खेळ असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. शिक्षकांच्या बदल्या रद्द न झाल्यास लिंबागणेशकर रस्त्यावर उतरून आंदोलन छेडण्यास भाग पाडले जाईल, असा इशारा पालक व ग्रामस्थांनी दिला आहे.



## शासनाने अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना नुकसान भरपाई द्यावी-राजेंद्र मस्के

बीड । प्रतिनिधी

मे महिन्यात पडलेल्या पावसामुळे शेतकऱ्यांचा फायदा झाला. परंतु १३ ऑगस्ट पासून सुरू झालेल्या अतिवृष्टीमुळे जिल्ह्यातील १७ महसूल मंडळांत अतिवृष्टीची झाल्याची नोंद समोर आली आहे. अतिवृष्टीचा जिल्हाभरातील शेतकऱ्यांना मोठा फटका बसला. शेत पिके, शेतजमीन, तर अनेक ठिकाणी रस्ते व पुलांचे प्रचंड नुकसान झाले आहे.

शेतकऱ्यांची गंभीर परिस्थिती लक्षात घ्यावी. व तातडीने पंचनामे करून शासनाने मदत जाहीर करावी. तसेच ग्रामीण भागातील रस्ते पुल सुधारणांसाठी विशेष निधीची तरतूद करावी, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी केली आहे. संपूर्ण जिल्हाभरात कोसळलेल्या अतिवृष्टी मुळे कापूस सोयाबीन, तूर ,उडीद, मूग, बाजरी या सारख्या उभ्या पिकाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होते झाले. असून काही ठिकाणी फळबागांचे ही नुकसान झाले आहे. शेत जमिनी वाहून गेल्या तर काही ठिकाणी जलमय परिस्थिती निर्माण झाल्याने शेतकऱ्यांच्या शेतजमिनीचे नुकसान झाले.

ग्रामीण भागातील रस्ते व पूलांचे अतोनात नुकसान झाले. रस्ते व पुलांच्या नुकसानी मुळे रहदारीचा प्रश्न निर्माण होणार आहे. यावर्षी खरीपाची जवळपास शंभर टक्के पेरणी झालेली आहे.विम्याचा खर्च जास्त असल्याने अनेक शेतकरी विम्या पासून वंचित आहे. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांची संख्या मोठी आहे. शेतकऱ्यांना मदतीचा हात देण्यासाठी पंचनामे करून तातडीने नुकसान भरपाई देण्यात यावी.

# कृषि पदविका अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया सुरु

बीड। प्रतिनिधी

खते बी-बियाणे आणि औषधांचे दुकानदार म्हणजेच कृषि सेवा केंद्राचे चालकांसाठी कृषि विस्तार पदविका अर्थात देसी डिप्लोमा इन ॲग्रीकल्चरल सर्व्हिसेस फॉर इनपुट डिलर्स या अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया सुरु झाली असून बीड जिल्हयातील सर्व खते बी-बियाणे दुकानदारांनी केंद्र शासनाच्या निर्णयानुसार तात्काळ या अभ्यासक्रमास प्रवेशासाठी संपर्क करावा, असे आवाहन सौ. के. एस. के. (काकू) कृषि महाविद्यालय, म्हसोबा फाटा नगर रोड, बीड यांनी केले आहे.

(मॅनेज) या हैद्राबाद येथील कृषि विस्तार प्रबंधन संस्थानच्या अंतर्गत वनामती, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात येणाऱ्या कृषि निविष्ठा वितरकांकरीता कृषि विस्तार पदविका या कृषि-निविष्ठा विक्रेत्यांसाठी आयोजित करण्यात आलेल्या पदविका अभ्यासक्रमासाठी प्रशिक्षण केंद्र म्हणून मा.प्रकल्प संचालक आत्मा, बीड यांच्या मार्फत सौ. के. एस. के. (काकू) कृषि महाविद्यालयास मान्यता मिळाली आहे. जे जुने कृषि निविष्ठाधारक आहेत किंवा ज्या कृषि निविष्ठाधारकांची कृषि पदवी पूर्ण नाही अशा कृषि निविष्ठाधारकांसाठी हा एक वर्षीय कृषि विस्तार पदविका अभ्यासक्रम आहे. ज्याच्या तासिका आठवडयातील फक्त एक दिवस घेतल्या जातात. ज्यामुळे त्यांच्या दैनंदिन व्यापारात अडथळा निर्माण होणार नाही. तरी या एकत्रित म्हणजेच तिन्ही निविष्ठा विक्री करिता एकच कोर्स देसी या अभ्यासक्रमाचा परिसरातील व जिल्ह्यातील सर्व कृषि सेवा केंद्र धारकांनी लाभ घ्यावा.शेतकऱ्यांना कृषि निविष्ठा विक्रेत्यांमार्फत योग्य माहिती पुरविणे हा या प्रशिक्षण कार्यक्रमाचा उद्देश असून या प्रशिक्षणासाठी या महाविद्यालयातील पहिल्या तुकडीच्या अभ्यासक्रमाची दखल घेवून महाविद्यालयास नोडल प्रशिक्षण संस्था म्हणून अभ्यासक्रमाच्या बॅचेसला (अनुदानित तत्वावर) मान्यता मिळाली आहे. देसी हा अभ्यासक्रम ४८ आठवडयाचा असून हा अभ्यासक्रम तिन्ही प्रकारच्या परवानाधारकांसाठी भविष्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा आहे. सध्या या काकू कृषि महाविद्यालयातील प्रशिक्षण केंद्रा मार्फत चार तुकडया (बॅचेस) यशस्वीरित्या पुर्ण करण्यात आलेल्या आहेत. त्यामुळे या चारही तुकडींचे वर्ग सुरळीत पूर्ण होवून प्रवेश घेतलेल्या कृषि निविष्ठा धारकांच्या अत्यंत समाधानकारक प्रतिक्रीया आहेत.

## मुला -मुलींसाठी शासकीय वस्तीगृहात प्रवेशासाठी ऑनलाईन अर्ज सादर करण्याचे आवाहन

बीड । प्रतिनिधी

शैक्षणिक सन २०२५-२६ करिता इतर मागास प्रवर्गातील मुला मुलींसाठी शासकीय वस्तीगृहामध्ये प्रवेशासाठी ऑनलाईन अर्ज प्रक्रिया सुरू झाली असून त्यानुसार इतर मागास बहुजन कल्याण विभागाअंतर्गत कार्यरत असलेल्या मुला मुलींच्या वस्तीगृहामध्ये तसेच आधार व स्वयम योजना अंतर्गत १२ वी नंतरच्या अभ्यासक्रमामध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना प्रवेश घेता येणार आहे. शासनाच्या ऑनलाइन पोर्टलवर बी. एम./ बी.कॉम, बी.एस.सी अशा बारावी नंतरच्या अभ्यासक्रमामध्ये प्रवेश घेतलेल्या पदवी आणि एम.ए./एम.एस.सी असे पदवीनंतरचे पदव्युतर अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना मुदतवाढ दिली आहे.

व्यावसायिक अभ्यासक्रम वगळून दिनांक १७ ऑगस्ट २०२५ ते २७ ऑगस्ट २०२५ पर्यंत अर्ज भरून ऑनलाईन भरलेल्या अर्जाची प्रिंट व आवश्यक कागदपत्रे संबंधित वस्तीगृहास विहीत मुदतीत सादर करावे. जिल्ह्यातील इमाव. विमाप्र. विजाभजविद्यार्थ्यांनां वसतीगृह आधार व स्वयम योजनेचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा. अधिक माहितीसाठी ओबीसी मुलामुलींचे वस्तीगृह बीड येथील गृहपाल तसेच सहाय्यक संचालक कार्यालयाशी संपर्क साधावा,असे आवाहन इतर मागास बहुजन कल्याणचे सहाय्यक संचालक डी.बी. क्षीरसागर यांनी केले आहे.

## श्रावण मास सोहळ्यातील ४१ व्या अनुष्ठानाची सांगता

बीड । प्रतिनिधी

सर्व भावी भक्तांना व शिवगणनांना कळविण्यात आनंद होतो की दरवर्षी प्रमाणे श्रीक्षेत्र कपिलधार येथे श्रावण मासात श्री शिवानंद शिवाचार्य मठ संस्थान तमलूरचे मठाधीश श्री ष.ब्र.१०८ तपोरत्न सदगुरू शिवानंद शिवाचार्य महास्वामिजी यांच्या ४१ व्या अनुष्ठानाची सांगता बुधवार दि. २० ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी होणार आहे. यानिमित्त बुधवारी सकाळी श्री मन्मथ मुक्तिधाम मठ ते श्री मन्मथ स्वामी समाधी स्थळ पर्यंत सवाद्य अश्व रूढ मिरवणूक सोहळा निघणार आहे.

या श्रावण महिन्याच्या पावन पूर्व काळानिमित्त गुरु माऊली यांनी श्रीक्षेत्र कपिलधार येथे आपल्या अनुष्ठानमध्ये ईष्ठलिंग शिवपूजा, संगीत रुद्र पूजा व दररोज शिवपाठ भजन व प्रवचन व गुरु महाराजांच्या मुखातून अमृत उपदेश श्रवण केले. या सर्व कार्यक्रमाला आंध्रप्रदेश,कर्नाटक , तेलंगणा आदी विविध राज्यातून लाखो भाविक भक्त व श्रोत्यांनी श्रीक्षेत्र कपिलधार येथे भरभरून प्रतिसाद दिला व कार्यक्रमाची शोभा वाढवली. बुधवार दि.२० ऑगस्ट २०२५ रोजी ४१ व्या अनुष्ठानाची भक्तिमय वातावरणामध्ये सांगता होणार आहे.

यामध्ये भाविक भक्त व महिला भगिनी डोक्यावर कलश घेऊन महाराजांची अश्व रूढ मिरवणूक काढणार आहेत तरी या सुवर्णमयी कार्यक्रमास पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी उपस्थिती लावून कार्यक्रमाची शोभा वाढवावी असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

## अर्जदार शेतकऱ्यांनी सोडत प्रक्रियेसाठी उपस्थित राहण्याचे आवाहन

बीड । प्रतिनिधी

राज्यातील शेतकऱ्यांचे केवळ उत्पादन व उत्पादकता वाढविणे हे ध्येय यापुढे न राहता उत्पादित होणाऱ्या शेतमालाची दर्जात्मक सुधारणा करण्यासाठी नवीन तंत्रज्ञानाचा वापर शेतकऱ्यांनी करणे अत्यंत गरजेचे आहे. शेतीशी निगडित घटकांबाबत जगात वेळोवेळी होत असलेल बदल, विकसित होत असलेले तंत्रज्ञान हे शेतकऱ्यापर्यंत त्यांच्या गरजेनुरूप योग्यवेळी पोहचवीने आणि त्यासाठी आवश्यक साहय्य व सोयी सुविधा पुरविणे निकडीचे आहे.

कृषी विस्तार कार्यक्रमांमध्ये शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाची माहिती देण्याकरिता करावयाच्या विविध उपयोजनांसाठी कृषी विभागाकडून राज्यातील शेतकऱ्यांचे प्रदेश दौरे ही योजना राबविण्यात येत आहे. तसेच बीड जिल्ह्यातील महिला १, केंद्र, राज्य कृषी पुरस्कार प्राप्त, पिक स्पर्धा विजेते शेतकरी -१. इतर शेतकरी-३ असे एकूण ५ शेतकऱ्यांचा देशाबाहेरील अभ्यास दौरे याबाबत लक्षांक प्राप्त आहे.त्यानुसार प्रदेश अभ्यास दौऱ्याकरिता इच्छुक शेतकऱ्यांचे प्रस्ताव तालुका कृषी अधिकारी मार्फत मागविण्यात आले असून प्राप्त अर्जाची संख्या लक्षांकापेक्षा जास्त प्राप्त असल्याने प्रदेश अभ्यास दौरा मार्गदर्शक सूचना सन २०२५-२६ नुसार सोडत पद्धत अवलंबावी असे निर्देशित केले आहे. त्यानुसार प्राप्त अर्जामधून सोडत पद्धतीने निवड करण्यासाठी सोडत प्रक्रिया दिनांक २१ ऑगस्ट २०२५ रोजी दुपारी एक वाजता जिल्हा अधीक्षक, कृषी अधिकारी कार्यालय बीड येथे करण्यात येणार आहे. अर्जदार शेतकऱ्यांनी सोडत प्रक्रियेसाठी उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी सुभाष साळवे यांनी कळविले आहे.

## ईद-ए-मिलादुन्नबी जयंती समितीच्या अध्यक्षपदी सय्यद सलीमबापू

### निवड समितीने तिसऱ्यांदा केली निवड

माजलगाव । प्रतिनिधी

५ सप्टेंबर रोजी साजऱ्या होण्याऱ्या ईद-ए-मिलादुन्नबी जयंतीनिमित्त अहले सुन्नतवल जमाअत कमीटी उत्सव समितीच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ नेते सय्यद सलीमबापू यांची निवड करण्यात आली आहे.त्यांच्या नेतृत्वाखाली उत्सवाच्या तयारीस प्रारंभ झाला असून,जुलुस,धार्मिक व सामाजिक कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी समिती सक्रिय झाली आहे.दरम्यान सलीमबापू यांच्या अध्यक्षतेखाली विविध उपक्रमांचे नियोजन करण्यात येणार असून, त्यांची ही निवड समितीकडून तिसऱ्यांदा करण्यात आली आहे.



इस्लाम धर्माचे सर्वश्रेष्ठ हजरत मोहम्मद पैगंबर यांची जयंती म्हणून ईद-ए-मिलाद साजरी केली जाते.ह.मोहम्मद पैगंबर हे अल्लाहचे अंतिम प्रेषित होते.इस्लामच्या धारणेनुसार अल्लाहने त्यांच्या मार्फत कुराण हा धर्मग्रंथ लोकांपर्यंत पोहोचवला.इस्लाम मध्ये ईद-ए-मिलाद हा सर्वात मोठा दिवस मानला जातो.हजरत मोहम्मद पैगंबर यांनी त्यांच्या आयुष्यात नेहेमीच शांततेचा संदेश दिला आहे.त्यांच्या या शिकवणीची आठवण त्यांनी दिलेल्या कुराणची शिकवण ही सर्वसामान्य नागरिकांच्या लक्षात राहावी आणि त्यांनी आपल्या जीवनात ती अमलात आणावी यासाठी ईद मिलादुन्नबी साजरी केली जाते. यानिमित्त शहरातील आझाद नगर भागात १७ ऑगस्ट रोजी बैठक पार पडली.यावेळी ५ सप्टेंबर रोजी ईद-ए-मिलादुन्नबी निमित्त साजरी होणाऱ्या उत्सव समितीच्या अध्यक्षपदी या भागातील ज्येष्ठ नेते सय्यद सलिमबापु यांची सर्वानुमते निवड करण्यात आली.दरम्यान ईद ईद मिलादुन्नबी निमित्त शहरात जुलूस मिरवणूक काढण्यात येणार आहे.मज्जीद मध्ये धार्मिक प्रवचन करण्यात येणार आहे.मिठाई, सरबत वाटप केली जाणार आहे. त्याचप्रमाणे विविध धार्मिक कार्यक्रमाची मेजवानी नागरिकांना अनुभवास मिळणार आहे.जशने मिलाद मध्ये सहभागी होण्याचे आवाहन जयंती अध्यक्ष सय्यद सलिमबापु,सय्यद सिराजोद्दीन कादरी.सय्यद युसुफोदीन कादरी आगा खान साहब.शेख महेबुब. शेख मुस्तकीम.सय्यद रईसोद्दीन कादरी.मिर्झा महेमुद.शेख आसेफ भाऊ सय्यद रहीम फिटर.सय्यद समीर.सय्यद मुदस्सीर.शेख हारून फिटर.शेख अख्तर.शमशेर पठाण.सय्यद तौफिक.अहले सुन्नतवल जमाअत कमीटी माजलगाव कडुन सय्यद अली खतीब आसेफ.शेख महेबुब.सय्यद शफिक भाऊ.शेख इलियास.शेख गुलाब.शेख चुन्नु. सय्यद तौफिक कादरी.सय्यद फारुख अण्णा यांनी केले आहे.

Daily Rajya loktantra Date -19/08/2025

CHANGE THE NAME

I have changed my old NameThorve Balasaheb Bhiku to New Name Balasaheb Bhikuji Thorve

**जाहीर प्रगटन**

**मा. श्रीमती ए. बी. निवारे १९ वे सह दिवाणी न्यायाधीश, व, स्तर, बीड यांच्या न्यायालयात.**

**किरकोळ दिवाणी अर्ज ११७८/२०२५**

**ॲड. एम. आर. उबाळे**

**द्रोपदी वगैरे विरुध्द निरंक**

अर्जदार - (१) द्रोपदी सुनिल घाडगे, वय ४२ वर्ष, धंदा घरकाम रा. आहेरवडगांव, ता. जि. बीड, २) अजय सुनिल घाडगे, वय २१ वर्ष, धंदा शिक्षण रा. सदर, (३) विजय सुनिल घाडगे, वय २१ वर्ष, धंदा शिक्षण रा. सदर, ४) सुवर्णा सुनिल घाडगे, वय २६ वर्ष, धंदा घरकाम रा. सदर, ५) प्रतिक्षा सुनिल घाडगे, वय २३ वर्ष, धंदा घरकाम रा. सदर

विरुद्ध निरंक

मागणी अर्ज:- बॉम्बे रेग्युलेशन मॅक्ट १८२७ चे कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळने बाबत.वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत सुनिल बाबासाहेब घाडगे यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज केला आहे. ज्याअर्थी मयत सुनिल बाबासाहेब घाडगे यांचा मृत्यु दि. १३/०५/२०२५ रोजी आहेरवाडगांव, ता.जि. बीड येथे झाला आहे. अर्जदार क्र. १ हा मयताचा मुलगा असून अर्जदार क्र. २ व ३ हे मयताचे मुले आहेत. अर्जदार क्र. ४ व ५ या मयताच्या मुली आहेत.

वरील अर्जदारास शासकीय व निमशासकीय कामाकरीता व इतर कार्यालयीन उपयोगाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार व गैरअर्जदार सदरहु मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहिरनाम्यांचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोर्ट सदरहु अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु मयत सुनिल बाबासाहेब घाडगे यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक २१ माहे जुलै २०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले,

सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. २९ ऑगस्ट २०२५.

स्वाक्षरीत
**क. लिपिक**

आदेशावरून
स्वाक्षरीत
**अधीक्षक**
दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड

## दमदार पावसाविना फुलसांगवी साठवण तलाव अतृप्त

### फुलसांगवीकरांच्या वाट्याला याहीवर्षी प्रतिक्षाच; पाणी पातळी अद्याप तळालाच

शिरूर । प्रतिनिधी

पावसाळा लागून अडीच महिन्याचा कालावधी उलटून गेला तरी फुलसांगवी परिसरामध्ये दमदार पाऊस न बरसल्याने फुलसांगवी साठवण तलावाची तहान अद्याप तरी अतृप्तच आहे. फुलसांगवी साठवण तलाव पूर्ण क्षमतेने भरावा अशी परिसरातील शेतकऱ्यांना अपेक्षा लागून राहिली आहे. मात्र याही फुलसांगवी करांच्या वाट्याला दमदार पावसाची प्रतीक्षा आली असल्याचे पहायला मिळत आहे.

पावसाळा सुरू होण्यापूर्वी यावर्षी अवकाळी बरसला यामुळे शेतकऱ्यांना काहीसा दिलासा तर काही त्रासही झाला. शेतातील पूर्व मशागत करण्यापूर्वी पावसाने लावून धरल्याने शेतातील कामे खोळंबली होती. यामुळे ऐन पावसाळ्याच्या तोंडावर पूर्व मशागतीच्या कामासाठी शेतकऱ्यांच्या तोंडाला फेस आला होता. तर दुसरीकडे ऊस उत्पादक शेतकऱ्यांना या अवकाळी पावसामुळे चांगलाच दिलासा मिळाला होता. कडाक्याच्या उन्हाळ्यात वाळून चाललेला उसाच्या पिकाला अवकाळी पावसामुळे चांगलेच जीवदान मिळाले होते. यावर्षी पाऊस चांगला आहे हवामान खात्याने वेळोवेळी बाकीचे केल्याने शेतकरी शेताच्या बांधावरती पूर्वमशागतीची कामे उरकून जून महिन्यामध्ये झालेल्या अल्पशा पावसा वरतीच खरीप हंगामातील पिकांची लागवड, पेरणी करून बसला होता. सुमारे दोन महिन्याची वरून राजाने उघडीप दिल्याने शेतातील उभे पिके माना टाकू लागले होती. गेल्या दहा-पंधरा दिवसापासून वरून राजाचे वरून राजाचे पुनरागमन झाले असले तरी फुलसांगवी परिसरामध्ये अद्याप तरी दमदार पावसाची प्रतीक्षा आहे. पावसाळ्याचा दोन -अडीच महिन्याचा कालावधी उलटला तरी दमदार पावसाअभावी परिसरातील ओढे, नदी नाले खेळाळून वाहिली नाहीत परिणामी परिसरातील छोट्या-मोठ्या पाझर तलावासह फुलसांगवीच्या साठवण तलावाला आद्याप तरी दमदार पावसाची प्रतीक्षाच आहे. तलावातील पाणी पातळी अद्याप तळालाच असल्याने फुलसांगवीसह परिसरातील शेतकऱ्यांच्या वाट्याला दमदार पावसाची प्रतीक्षा आली आहे.

फुलसांगवी येथील साठवण तलावाची सप्टेंबर महिन्यामध्ये १९ वर्षे पूर्ण होत आहे. १९ वर्षाच्या कार्यकाळामध्ये सन २०२१ मध्ये हा साठवण्यात आला पूर्ण क्षमतेने भरला होता. हा तलाव पूर्ण क्षमतेने भरावा अशी शेतकऱ्यांना दरवर्षी अपेक्षा असते मात्र दमदार पावसाअभावी शेतकऱ्यांच्या वाटेला उपेक्षाच येते.

# एसटी कामगार संघटनेच्या जिल्हाध्यक्षपदी ज्ञानेश्वर चातूर तर सचिवपदी गणेश चव्हाण

गेवराई । प्रतिनिधी

महाराष्ट्र एस टी कामगार संघटनेची बीड विभागाची सर्वसाधारण सभा संपन्न २०२५-२०२६दिनांक १७-०८-२०२५ वार रविवार रोजी एकमेव मान्यता प्राप्त महाराष्ट्र एस टी कामगार संघटनेच्या बीड विभागाची सर्वसाधारण सभा हॉटेशांताई,जालना रोड,बीड येथे घेण्यात आला. या सर्वसाधारण सभेचे अध्यक्षपद बीड आगाराचे ज्येष्ठ वाहक सुनील भाऊ टाक यांनी भूषविले कार्यक्रमाची सुरवात ही कामगारांचे दैवत असलेले, स्व.श्री भाऊ फाटक यांच्या प्रतिमेला पुष्पहार घालून पूजन करून करण्यात आले.यानंतर गेवराई आगारातील लिपिक कर्मचारी कै.प्रितेश चव्हाण यांना भावपूर्ण श्रद्धांजली सर्व सभेतर्फे अर्पण करण्यात आली.

तसेच गणेश बापू वर विश्वास ठेवून बीड विभागीय कार्यालयातील लिपिक प्रताप शिंदे तसेच त्यांच्या इतर सर्व सदस्यांनी महाराष्ट्र एस टी कामगार संघटनेत प्रवेश केला कार्यक्रमासाठी बीड विभागातील बीड आगार अध्यक्ष: राजु पवार व सचिव:- नितिन रसाळ बीड विभागीय कार्यलय अध्यक्ष:- संतोष मुळे व सचिव:- विकास गाडेकरमाजलगाव आगार अध्यक्ष: लिबाजी पोटभरे व सचिव:- सुरेद्र पवार गेवराई आगार अध्यक्ष:- ज्ञानेश्वर चातूर व सचिव:- सुयोग दाभाडे बीड विभा. कार्यशाळा अध्यक्ष:-जी जे पांचाळ व सचिव:- देवराज यमपुरे आष्टी आगार अध्यक्ष:- गणेश काळे व सचिव:- सचिन काळे धारुर आगार अध्यक्ष:- डी बी मुंडे व सचिव:-जगदीश थोरात पाटोदा आगार अध्यक्ष:-गणेश रसाळ व जेष्ठ कार्यकर्ते:- अजिनाथ वारे तसेच बीड विभागातील कामगार संघटनेचे सर्व डिलिगेट्स व असंख्य सभासद हजर होते सर्वानुमते बीड विभागीय अध्यक्ष पदी ज्ञानेश्वर चातुर यांची तर बीड विभागीय सचिव पदी गणेश बापू चव्हान यांची निवड करण्यात आली तसेच बीड विभागीय कार्याध्यक्ष पदी रमेश भाऊ गीते,संघटक सचिव पदी श्रीवल्लभ चिरके,सहसचिव पदी विजय कुडके,तर कोषाध्यक्षपदी पुन्हा विलास आजले यांची निवड करण्यात आली कार्यक्रमाचे सूत्र संचालन हे श्री.प्रताप शिंदे यांनी केले तर समस्त पदाधिकाऱ्यांना प्रमुख पाहुणे व कार्यक्रमाचे अध्यक्ष सुनील भाऊ टाक यांनी संबोधित केले तसेच नवनियुक्त अध्यक्ष व सचिवांनी पण कामगार संघटना कामगारांसाठी कशी काम करते व येणाऱ्या काळात संघटनेचे कार्य कसे असेल याबद्दल माहिती दिली सदर कार्यक्रम हा अत्यंत खेळी-मेळीच्या वातावरणात संपन्न झाला.



# होळ येथे माजी विशेष पोलिस महानिरीक्षक अंकुशराव शिंदे यांचा सेवापूर्तीनिमित्त गौरव

## जंगी मिरवणूक काढून नागरी सत्कार; माजी मुख्य न्यायमूर्ती संभाजीराव शिंदे यांची विशेष उपस्थिती

केज । प्रतिनिधी

तालुक्यातील होळचे सुपुत्र, राज्याच्या व्हीआयपी सुरक्षा विभागाचे माजी विशेष पोलिस महानिरीक्षक अंकुशराव शिंदे हे नुकतेच सेवानिवृत्त झाले. त्यांच्या कार्याचा गौरव करण्यासाठी सेवापूर्ती सन्मान सोहळ्याचे आयोजन रविवारी (दि.१७) सकाळी ११ वाजता होळ येथील हनुमान मंदिरात करण्यात आले. या सोहळ्यापूर्वी ग्रामस्थांनी जंगी मिरवणूक काढून त्यांचे उस्फूर्त स्वागत केले.

कार्यक्रमाला राजस्थानचे माजी मुख्य न्यायमूर्ती संभाजीराव शिंदे विशेष अतिथी



म्हणून उपस्थित होते. सोहळ्याचे अध्यक्षस्थान सरपंच अश्विनीताई शिंदे यांनी भूषविले. प्रमुख अतिथींमध्ये मांजरा कारखान्याचे माजी कार्यकारी संचालक दत्ता शिंदे, माजी सरकारी वकील ॲड.प्रकाश शिंदे, पुणे सीआयडीचे माजी पोलीस उपअधीक्षक दीपक शिंदे, केंद्रप्रमुख रमेश कांबळे, माजी प्राचार्य डॉ.ज्ञानोबा सरवदे, बारामती ॲग्रोचे प्रबंधक अंकुश ढवारे, मुख्याध्यापक धर्मराज शिंदे, हृदयरोगतज्ज्ञ डॉ.नवनाथ घुगे, डॉ.गणेश ढवारे यांचा समावेश होता. यावेळी मान्यवरांचा होळ ग्रामस्थांच्यावतीने सपत्नीक सत्कार करण्यात आला. ग्रामस्थांच्या पुढाकाराने पार पडलेल्या या सोहळ्यास परिसरातील नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत मोठ्या संख्येने हजेरी लावली. होळ गावातील दोन उच्चपदस्थ अधिकाऱ्यांचा झालेला हा गौरव सोहळा ग्रामस्थांसाठी अभिमानाचा क्षण ठरला. यावेळी जिल्ह्यातील राजकीय, सामाजिक व प्रशासकीय क्षेत्रातील अनेक मान्यवरही उपस्थित होते.

### आठवणींना उजाळा

या सोहळ्यात संभाजीराव शिंदे व अंकुशराव शिंदे यांनी आपल्या मनोगतातून शालेय जीवनापासून ते आजवरच्या प्रवासातील अनेक आठवणींना उजाळा दिला. दोघेही बनेश्वर शिक्षण संस्थेचे माजी विद्यार्थी असल्याने शिक्षण संस्थेबद्दल व होळच्या मातीतून मिळालेल्या संस्कारांबद्दल त्यांनी कृतज्ञता व्यक्त केली. त्यांच्या भाषणातून गावाशी असलेली घट्ट नाळ प्रकर्षाने जाणवली.

## नुकसान भरपाई सह सरसकट पिक विमा,कर्जमाफी द्या -शेकाप



माजलगाव । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यासह महाराष्ट्रात गेल्या आठ दिवसापासून सततधार पावसाने व अतिवृष्टी झाल्याने शेतकऱ्याच्या शेतीचे प्रचंड नुकसान झाले असून तूर,कापूस, उडीद,मूग,बाजरी आदि पिके पावसामुळे उध्वस्त झाली आहेत, अनेक पिके पावसाने वाहून गेली असून शेतकऱ्यांच्या पिकाचे अतोनात नुकसान झाले आहे त्यामुळे कर्जाच्या संकटात सापडलेला शेतकरी हतबल झाला असून शेतकऱ्याच्या शेतीच्या नुकसानीची एकरी ५० हजार रुपये नुकसान भरपाई त्वरित देण्यात यावी तसेच २०२५ चा सालाचा सरसकट १००% पीक विमा लागू करण्यात यावा,शेतकऱ्याचे संपूर्ण कर्ज माफ करा,गत वर्षीचा १००% पिक विमा सरसकट वाटप करा आदि मागण्यासाठी शेतकरी कामगार पक्षाच्या शिष्ट मंडळाने उपविभागीय अधिकारी गौरव इंगोले यांच्या कार्यालयात शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांवर दि.१८ ऑगस्ट सोमवार रोजी निवेदन दिले असून शेतकऱ्यांच्या शेतातील पिकांच्या झालेल्या नुकसानी बाबत,एकरी पन्नास हजार रुपये अतिवृष्टीची नुकसान भरपाई, सरसकट पिक विमा,कर्जमाफी सह सर्वच मागण्या त्वरित मंजूर करण्यात याव्यात अन्यथा शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने दिनांक २३ ऑगस्ट २०२५ रोजी गंगामसला येथे सकाळी १०:०० वाजता रस्ता रोको आंदोलन करण्याचा इशारा शेतकरी कामगार पक्षाचे नेते तथा राज्य मध्यवर्ती समिती सदस्य भाई ॲड नारायण गोले पाटील,भाई राहुल सोळंके,भाई अशोक कुलकर्णी, भाई सतीश शेजुळ, भाई चांगदेव शेजुळ,भाई लहू शेजुळ आदिंनी दिला आहे.

# परळी येथे उद्या शेतकऱ्यांसाठी पशुवैद्यक मेळावा -डॉ वसंत मुंडे

परळी । प्रतिनिधी

शेतकऱ्याची निगडित आणि जोडधंदा म्हणून पशुपालन हा महत्त्वाचा जोडधंदा असल्याने शेतकऱ्यांना याची अधिक गोडी आणि त्यातील बारकावे माहिती व्हावी यासाठी परळी येथे वीस ऑगस्ट रोजी शेतकऱ्यांसाठी पशुवैद्यक मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे या मेळाव्याचा परळी तालुक्यातील शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा असे आवाहन माजी पशुवैद्यकीय अधिकारी डॉक्टर वसंत मुंडे यांनी केले आहे





परळी येथील श्रद्धा मंगल कार्यालय शहर पोलीस ठाण्यात जवळ या एक दिवशी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे पशुवैद्यकीय क्षेत्रात आज आणि उद्या काय घडणार यावर या क्षेत्रातील आजी-माजी अधिकारी शेतकऱ्यांना मिळाव्यात मार्गदर्शन करणार आहेत पशुवैद्यकीय क्षेत्रातील बेरोजगारी समस्या व उपाय यावर देखील कार्यशाळा होणार असून दिनांक २० ऑगस्ट रोजी श्रद्धा मंगल कार्यालयात हा मेळावा सकाळी ११ ते ४ या वेळेत होणार आहे तरी याचा पशु क्षेत्रातील संबंधित पर्यवेक्षक पशुधन पालक यांनी लाभ घ्यावा असे आवाहन डॉक्टर वसंत मुंडे यांनी केले आहे.

## शिवानंद शिवाचार्य महास्वामिजी यांचे श्रावण मास सोहळ्यातील ४१ व्या अनुष्ठानाची बुधवारी सांगता

बीड । प्रतिनिधी

सर्व भावी भक्तांना व शिवगणनांना कळविण्यात आनंद होतो की दरवर्षी प्रमाणे श्रीक्षेत्र कपिलधार येथे श्रावण मासात श्री शिवानंद शिवाचार्य मठ संस्थान तमलूरचे मठाधीश श्री ष.ब्र.१०८ तपोरत्न सदगुरू शिवानंद शिवाचार्य महास्वामिजी यांच्या ४१ व्या अनुष्ठानाची सांगता बुधवार दि. २० ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी होणार आहे. यानिमित्त बुधवारी सकाळी श्री मन्मथ मुक्तिधाम मठ ते श्री मन्मथ स्वामी समाधी स्थळ पर्यंत सवाद्य अश्व रूढ मिरवणूक सोहळा निघणार आहे.



या श्रावण महिन्याच्या पावन पूर्व काळानिमित्त गुरु माऊली यांनी श्रीक्षेत्र कपिलधार येथे आपल्या अनुष्ठानमध्ये ईष्ठलिंग शिवपूजा, संगीत रुद्र पान ३ वर

## बार्शीनाका रेल्वेस्टेशनचे काम त्वरीत सुरू करा- खुर्शीद आलम

बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्याच्या उपमुख्यमंत्री तथा बीडचे पालकमंत्री अजित दादा पवार १५ ऑगस्ट निमित्ताने बीडच्या दौऱ्यावर आले होते या यावेळी बार्शी नाका रेल्वे स्टेशन कृती समितीच्या शिष्टमंडळाने उपमुख्यमंत्री यांना भेटून निवेदन दिले आहे, निवेदनात म्हटले आहे की बीडचे रेल्वे स्टेशन बार्शीनाका इमामपूर रोड प्रकाश आंबेडकर नगर येथेच मंजूर आहेत असे असतानाही सदर रेल्वे स्टेशन पालवन येथे म्हणजे बीड शहराच्या ७ ते ८ कि.मि. दुर बांधण्यात आले आहेत, त्यामुळे लोकांची गैरसोय झाली आहे, पालवन रेल्वे स्टेशनवरून नगरला जाण्यासाठी पन्नास रुपये लागणार आहेत तर बीड शहरातून पालवण स्टेशनवर जाणेसाठी शंभर ते दीडशे रुपये खर्च होणार आहेत म्हणून पालवन रेल्वे स्टेशन नागरिकांना परवडणारे नाहीत म्हणून बार्शीनाका इमामपुर रोडवर रेल्वे स्टेशन थांबा चे काम त्वरित सुरू करावे कारण बार्शी नाक्यावरून शेतकऱ्यांना आणि सर्वच नागरिकांना नवा आणि जुना मोंढा. कृषी उत्पन्न बाजार समिती. एमआयडीसी. आठवडी बाजार. आडत मार्केट. बस स्टॅन्ड. जिल्हाधिकारी कार्यालय. तहसील कार्यालय. समाज कल्याण ऑफिस. जिल्हा रुग्णालय. एसपी ऑफिस. जिल्हा न्यायालय. पान ३ वर



# घाटनांदुर येथे जय मल्हार गणेश मंडळ यांच्या वतीने दहीहंडी मोठ्या उत्सवात साजरी

घाटनांदुर । प्रतिनिधी

अंबाजोगाई तालुक्यातील व परळी मतदारसंघातील सर्वात मोठी बाजारपेठ असलेले घाटनांदुर येथे जय मल्हार गणेश मंडळ यांच्या वतीने दहीहंडीचे १६ ऑगस्ट रोजी सायंकाळी ६ वाजता खंडोबा मंदिर बाजार चौक याठिकाणी दहीहंडीचे भव्य दिव्य आयोजन करण्यात आले होते या दहीहंडीच्या कार्यक्रमांमध्ये जय मल्हार गणेश मंडळ ग्रुप, वि.एस ग्रुप, व नितीन गोदाम व दयानंद लांडगे ग्रुप या तीन गोविंदा पथकाने या दहीहंडी मध्ये सहभाग घेतला होता यामध्ये तिन्ही गोविंदा



पथकांच्या वतीने चार थराची सलामी देण्यात आली व त्या नंतर टाईम लावून चार थराची सलामी देण्यात आली यामध्ये वि.एस, ग्रुपला दहीहंडी फोडण्याचा पहिला मान मिळाला व नंतर वि.एस ग्रुप ने प्रथम पारितोषिक पटकावले मान्यवरांच्या हस्ते रोख रक्कम व सन्मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले व दुसरे पारितोषिक जय मल्हार गणेश मंडळ यांना मान्यवरांच्या हस्ते रोख रक्कम व सन्मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले या दहीहंडी कार्यक्रमाच्या उत्सवामध्ये घाटनांदुर चा कलाकार श्रीकृष्ण कुसळे यांचे संस्कृतीक कला नृत्य सादर करण्यात आले या दहीहंडी उत्सवामध्ये हजारोच्या संख्येने पाहण्यासाठी पान ३ वर

# डॉ.ओमप्रकाश शेटे यांची पुस्तक तुला देवदूत प्रतिष्ठान चा प्रेरणादायी उपक्रम

दिंद्रुड । प्रतिनिधी

आयुष्मान भारत-मिशन महाराष्ट्र समितीचे अध्यक्ष डॉ.ओमप्रकाश शेटे यांचा वाढदिवस विविध सामाजिक, शैक्षणिक व लोकोपयोगी उपक्रमांनी साजरा करण्यात आला. डॉ.शेटे यांच्या ''हार-तुरे नको, पुस्तके द्या'' या आवाहनाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. यावेळी त्यांची पुस्तक तुला करण्यात आली. यांच्या वजनाऐवढे पुस्तके वाचनालयास भेट स्वरूपात देण्यात आले. विशेष म्हणजे तब्बल पंधरा तास उभा राहून डॉ.शेटे यांनी स्नेहीजनांच्या शुभेच्छा स्वीकारल्या.देवदूत प्रतिष्ठानच्या वतीने विधवा महिलेस शिलाई मशीन देऊन स्वावलंबनाचा संदेश दिला गेला.



डॉ.ओमप्रकाश शेटे यांच्या वाढदिवसानिमित्त देवदूत प्रतिष्ठानच्या वतीने त्यांची ''ग्रंथ-तुला'' करण्यात आली. या प्रेरणादायी उपक्रमाने एक नवा आदर्श घडवला. आरोग्यदूत डॉ. शेटे यांनी वाढदिवसा निमित्ताने ''बुके ऐवजी पुस्तके'' भेट देण्याचे आवाहन केले होते. या आवाहनाला राज्यभरातून उदंड प्रतिसाद मिळाला. अनेकांनी विविध प्रकारची ग्रंथ, पुस्तके भेट देऊन उपक्रम यशस्वी केला. या उपक्रमातून मिळालेली हजारो पुस्तके वाचनालयाला देण्यात आली. या अभिनव उपक्रमामुळे वाचन संस्कृतीला चालना मिळणार आहे. त्यांच्या वजनाइतके ग्रंथ व पुस्तके तराजूच्या एका मापात ठेवून ही तुला करण्यात आली.

यावेळी देवदूत प्रतिष्ठान च्या वतीने एका विधवा महिलेस शिलाई मशीन भेट देण्यात आली. सदर महिलेची उपजीविका भागवता यावी व घरबसल्या रोजगार मिळावा असा या मागील उद्देश असल्याचे प्रतिष्ठानचे अध्यक्ष बंडूजी खांडेकर यांनी सांगितले. तर जवळा येथील कुस्ती तालीम मधील मल्लांनी पुस्तकांसोबतच स्वतः च्या रक्ताने डॉ. शेटे यांचा फोटो काढून सदरील प्रतिमा भेट दिली. नागेश ठोंबरे व नागेश कानडे यांनी वाढदिवसानिमित्त शिवपार्वती गोशाळा येथील गायींसाठी चारा दिला. गोकुळअष्टमी पान ३ वर

## विशेष सरकारी वकील ॲड. उज्वल निकम यांचा बीड वकील संघाकडून सन्मान

बीड । प्रतिनिधी

**येथे विशेष सरकारी वकील ॲड. उज्वल निकम यांचा बीड वकील संघाकडून आज (सोमवार) विशेष सत्कार करण्यात आला. नुकतीच त्यांची राज्यसभेवर निवड झाल्याने बीड वकील संघाने अभिनंदन व सन्मानाचा कार्यक्रम आयोजित केला होता.**

आज संतोष देशमुख हत्या प्रकरणाची सुनावणी बीडच्या विशेष न्यायालयात पार पडली. यावेळी ॲड. उज्वल निकम स्वतः न्यायालयात उपस्थित



होते. सुनावणी संपल्यानंतर न्यायालयाच्या मध्यवर्ती सभागृहात बीड वकील संघाच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमात ॲड. निकम यांनी छोटेखानी भाषण करत बीड वकील संघाला आश्वासन दिले की, स्थानिक वकिलांच्या विविध समस्या सोडवण्यासाठी ते प्रयत्नशील राहतील. तसेच न्यायप्रक्रियेत वकिलांची भूमिका किती महत्वाची आहे, हे त्यांनी आपल्या भाषणात अधोरेखित केले. सत्कार सोहळ्याला पान ३ वर

## पंचनामे करून नुकसान भरपाई द्या -दत्ता कांबळे

माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील जवळपास सर्वच मंडळात गेल्या चार ते पाच दिवसापासून सातत्याने होत असलेल्या पावसामुळे शेतकरी हवालदिल झाला असून, अतिवृष्टीमुळे सोयाबीन, कापूस, मूग, तूर तसेच अन्य पिकांचे प्रचंड नुकसान झाले आहे.



सतत विनाखंड गेले चार ते पाच दिवसांपासून जोरदार मुसळधार पाऊस सुरु असून, शेतकऱ्यांना तोंडाशी आलेला घास आत्ता अतिवृष्टीमुळे हिरावून घेतला जाणार असल्याचे चित्र आहे. तसेच सलग तीन चार दिवसापासून सुरु असलेल्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांना प्रचंड नुकसानीचा सामना करावा लागत आहे.

परंतु, इथल्या ट्रिपल इंजिन सरकारला मात्र शेतकऱ्यांचे कसलेही सोयीर सुतक नाही असा सवाल कॉंग्रेस अनु. जाती विभागाचे जिल्हाध्यक्ष दत्ता कांबळे यांनी करत,किमान स्थानिक तहसीलदार आणि प्रशासनाने तरी शेतकऱ्यांचे शेतात पाणी साचून शेताला तळ्याचे स्वरूप आले असल्यामुळे तात्काळ पंचनामे पान ३ वर

## बीड शहरातील रस्त्यांचे वाटोळे: क्षीरसागर बंधू सह स्थानिक नेते घेऊ लागले श्रेय - ॲड शेख शफीक

बीड । प्रतिनिधी

बीड शहरातील रस्त्यांच्या दुरवस्थेमुळे नागरिक त्रस्त असताना, स्थानिक नेते आणि क्षीरसागर बंधूवर श्रेयवादाचा आरोप करत, मा बीड जिल्हा अध्यक्ष ॲड शफीक भाऊ यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी बीडच्या विकासासाठी दिलेल्या १०० कोटींच्या निधीचा वापर खरोखरच पान ३ वर



### रस्त्यांचे हाल आणि नागरिकांचा संताप

बीड शहरातील रस्त्यांची अवस्था अत्यंत दयनीय झाली आहे. खड्ड्यांनी भरलेले रस्ते, अपुरी ड्रेनेज व्यवस्था आणि रस्त्यांवरील विद्युत खांब यामुळे नागरिकांचे हाल होत आहेत. यासंदर्भात स्थानिक आमदार , स्थानिक सत्तेतले नेते, कार्यकर्ते सह निधी उपलब्ध करून देण्यासाठी पाठपुरावा केल्याचे सांगितले जात आहे. तथापि, शफीक भाऊ यांनी हा दावा फोल ठरवत, ''क्षीरसागर बंधूंनी आणि स्थानिक नेते सह फक्त आतापर्यंत केवळ श्रेय घेण्यासाठी आटापीटा केला, प्रत्यक्षात कामात अडथळे आणण्याचाच त्यांचा उद्योग आहे,'' आणि टक्केवारीसाठी आणि कार्यकर्ते पोसण्यासाठी हे हे जनतेची दिशाभूल करतात असा घणाघाती आरोप केला आहे.

चलो परळी !!! चलो परळी !!!

**पशुवैद्यक मेळावा**

**पशुवैद्यकीय क्षेत्र : काल, आज, उद्या पशुवैद्यकीय क्षेत्रातील आजी-माजी अधिकारी/कर्मचारी मेळावा पशुवैद्यकीय क्षेत्रातील बेरोजगारी समस्या व उपाय यावर एकदिवशीय मेळावा.**

**दिनांक : २० ऑगस्ट २०२५**
**ठिकाण : श्रद्धा मंगल कार्यालय, शहर पोलीस चौकी जवळ परळी वैजनाथ**
**वेळ :- सकाळी ११ ते ४ वाजेपर्यंत**

सहभाग पशुवैद्यक क्षेत्र संबंधित आजी-माजी अधिकारी, कर्मचारी, बेरोजगार पशुधन पर्यवेक्षक



आयोजक
डॉ.वसंत मुंडे (शेळीतज्ञ)
मो.नं.९४ २२ ५६ ५३ ६५
महाराष्ट्र शेळी उत्पादक संघ, धाराशिव

**आयोजक : माजी प्राचार्य, मार्कंडेय सर, प्रा.अनिल भिकाने, डॉ.परमेश्वर गुट्टे, डॉ.भागवत नाईकवाडे, डॉ.जकाते (गुप्ता), डॉ.गोल्टे, डॉ.यशवंत गित्ते (परळी), डॉ.लक्ष्मण पवार (नांदेड) डॉ.बेलकोणीकर (नांदेड), डॉ.देशपांडे (छ.संभाजीनगर), डॉ.राजशेखर दडके (छ.संभाजीनगर)**

# वडवणी ते साळींबा दोन महिन्यापूर्वी केलेल्या रस्त्यावर पडले खड्डे

वडवणी प्रतिनिधी:-

वडवणी अहिल्याबाई होळकर चौक ते साळींबा या सहा किलोमीटरचे रस्त्याचे काम गेले एक ते दोन महिन्यांपूर्वी संबंधित एजन्सी गुत्तेदारांनी केलेले असून सदरील रस्त्यावर ठिकठिकाणी खड्डे पडले आहेत तसेच काही ठिकाणी रस्ता खचला आहे त्यामुळे या रस्त्याची लवकरच दुरावस्था होण्याची शक्यता आहे तरी सार्वजनिक बांधकाम विभाग, संबंधित गुत्तेदार एजन्सीने रस्ता दुरुस्ती करावी अशी मागणी जनतेतून होत आहे .

वडवणी ते कवडगाव हा अर्ध्या तालुक्याला जोडणारा प्रमुख राज्यमार्ग असून यामध्ये या रोडवर मामला, साळींबा, पिंपरखेड,मोरेवाडी, कवडगाव





यासह असंख्य गावचा दळणवळणाचा प्रमुख रस्ता आहे तरी यामध्ये रस्त्याच्या मागणीसाठी ग्रामस्थ जनतेला मोठ्या प्रमाणात संघर्ष करावा लागतो यामध्ये लोकप्रतिनिधी दखल घेतल्यानंतर संबंधित रस्त्यासाठी करोडो रुपयांचा निधी उपलब्ध करून व पण टेंडरद्वारे संबंधित एजन्सी गुत्तेदाराला काम करण्याची मंजुरी दिली जाते तरी यामध्ये वडवणी येथील अहिल्याबाई होळकर चौक ते साळिंबा या सहा किलोमीटर रस्त्याचे काम गेल्या एक-दोन महिन्यापूर्वी सार्वजनिक बांधकाम विभाग अंतर्गत संबंधित एजन्सीने केलेले असून यासाठी करोडो रुपये निधी खर्च करण्यात आलेला आहे संबंधित रोडच्या हॉट मिक्स काम केल्यानंतर याची काहि वर्ष दुरुस्ती करण्याची जबाबदारी ही संबंधित एजन्सी गुत्तेदाराकडे असते तरी यामध्ये कामाच्या दोन महिन्यातच ऐण पावसाळ्यामध्ये साळिंबा या रोडची दुरावस्था झालेली असून यामध्ये साळिंबा फाटा तसेच साळिंबा पुलाच्या अलीकडे यासह इतर ठिकठिकाणी डांबर उखडून मोठ मोठाले खड्डे पडलेले आहेत तसेच अनेक ठिकाणी डांबरासहित रस्ता खचलेला आहे तरी यामुळे इतक्या लवकर केलेले कामाची दुरावस्था झाल्याचे पहावयास मिळत असून त्यामुळे सदरील काम हे नियमानुसार झाले आहे का यामध्ये डांबर व इतर साहित्याचा वापर नियमाप्रमाणे करण्यात आलेला आहे का असे प्रश्न या निमित्ताने निर्माण होत आहे तरी याकडे सार्वजनिक बांधकाम विभागाने तात्काळ लक्ष देऊन सदरील रोडची दुरुस्ती न केल्यास रोडची दुरावस्था होण्याची शक्यता नाकारता येत नाही तरी या भागाचे आमदार प्रकाश दादा सोळंके यांनी त्याकडे लक्ष देऊन संबंधित सार्वजनिक बांधकाम व गुत्तेदारांना समज देऊन रोड दुरुस्ती करण्याचे आदेश देण्याची मागणी जनतेतुन होत आहे.तसेच ग्रामस्थांकडून जनता व्यक्त केला जात आहे तरी सार्वजनिक बांधकाम विभागाने याविषयी तात्काळ लक्ष देऊन दुरुस्ती न केल्यास आंदोलन करण्याचा इशारा साळिंबा यासह ग्रामस्थांनी दिला आहे.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

cmyk

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा...नवे विचार...

पुणे विशेष

मंगळवार, दि.१९ ऑगस्ट २०२५ । पान ७

# पोलिसांवर मारहाण अन् शिवीगाळ केल्याचा आरोप करणाऱ्या तीन मुलींविरोधातच गुन्हा दाखल

**पुणे । प्रतिनिधी**

कोथरूड पोलिसांनी श्वेता पाटील आणि अन्य तीन अशा एकूण पाच जणांविरोधात गुन्हा दाखल केला आहे. कलम १३२ अंतर्गत सरकारी कामात अडथळा आणल्या प्रकरणी हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. बंडगार्डन पोलीस ठाण्यात पुन्हा दाखल करण्यात आलाय. पुण्यातील पोलीस आयुक्तालयात कोथरूड पोलिसांविरोधात ट्रॉसिटीचा गुन्हा दाखल करा, या मागणीसाठी गुन्हा दाखल करण्यात आलेल्या पाच जणांनी आणि त्यांच्यासोबत सहकाऱ्यांनी रात्रभर ठिय्या मांडला होता. या सगळ्या प्रकरणासंदर्भात पोलिसांनी दिलेल परिपत्रक देखील श्वेता पाटील आणि तिच्या सहकाऱ्यांनी फाडून टाकलं होतं. त्यामुळे या पाच जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. महत्त्वाचं म्हणजे आमदार रोहित पवार, सामाजिक अंजली आंबेडकर आणि सुजात आंबेडकर हे देखील रात्रभर उपस्थित होते. मात्र यांच्यावर कोणत्याही प्रकारचा गुन्हा दाखल झालेला नाही.



एक ऑगस्टला हा सगळा प्रकार समोर आला होता. कोथरूड पोलिसांनी तीन मुलींना मारहाण आणि जातीवाचक शब्दात शिवीगाळ केल्याचा आरोप मुलींनी केला होता. तुम्ही महारा मांग्याच्या पोरी आहात, किती मुलांसोबत झोपलेत आणि लेसबियन आहात का? अशा घाणेरड्या शब्दात पोलिसांनी तपासाचा भाग म्हणून या मुलींना प्रश्न विचारले होते, असा आरोप तीन मुलींनी केला होता. याप्रकरणी या मुली आणि त्यांचे काही सहकारी आक्रमक झाल्याच पाहायला मिळालं होत. आणि त्यांनी थेट पोलिसांकडेच दाद मागायला सुरुवात केली आहे मात्र पोलिसांकडनं कोणतीही दाद मिळत नसल्याचा आरोप देखील याच मुलींच्या सहकाऱ्यांनी केला होता.

कोथरूड पोलिसांच्या विरोधात या मागणीसाठी पोलीस आयुक्तालयात ३ ऑगस्ट सकाळी १० वाजेपासून रात्री तीन वाजेपर्यंत पीडित दोन मुली त्यांच्यासोबत त्यांना सहकार्य करणारी श्वेता पाटील, परिक्रमा खोत, अंजली आंबेडकर, सुजात आंबेडकर त्यांचे इतर ५० ते ६० सहकारी पोलिस आयुक्तालयात ठिय्या मांडला होता. या संपूर्ण प्रकरणी कोणत्याही तथ्य आढळले नसल्याचे संपूर्ण घटना इंडोर घडल्याचं पत्र पुणे पोलिसांनी या सगळ्यांना दिलं होतं. श्वेता पाटील हिने पोलिसांसमोरच फाडून टाकलं होतं. त्यानंतर दोन मुलींचे वैद्यकीय अहवाल समोर आले होते. त्यात मारहाण केल्याच्या कोणत्याही ताज्या जखमा किंवा व्रण नसल्याचं समोर आलं होतं. या सगळ्या प्रकरणानंतर पाच जणांवर गुन्हा दाखल केलाय. कोथरुड प्रकरणातील तीन मुलींसह पाच जणांविरोधात पुणे पोलीसांनी बंडगार्डन पोलीस ठाण्यात सरकारी कामात अडथळा आणल्याचा गुन्हा नोंद केला आहे.

# दारूच्या नशेत तरुणांचा धिंगाणा ; रहिवासी आणि हॉटेल मालक आमने–सामने

**पुणे । प्रतिनिधी**

**मुंढवा परिसरातील वडबन येथे असलेल्या हॉटेल पियो गार्टनमध्ये परवानगी न घेता अनऑफिशिअल फ्रेशर्स ४.० नावाची भव्य पार्टी**



**आयोजित करण्यात आली. या प्रकरणी हॉटेल मालक, जनरल मॅनेजर तसेच इव्हेंट मॅनेजमेंट कंपनीच्या संचालकांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

विवारी रात्री झालेल्या या कार्यक्रमात तब्बल ८०० ते १००० तरुण–तरुणी सहभागी झाले होते. मात्र, आयोजकांनी कोणतीही शासकीय परवानगी न घेता पार्टीचे आयोजन केले. वाहनतळाची सोय न करता ग्राहकांची वाहने रस्त्याच्या कडेला उभी केल्यामुळे वाहतुकीला अडथळा निर्माण झाला होता. यासंदर्भात स्थानिक नागरिकांनी आंदोलन केले होते.गुन्हा दाखल व्यक्तींची नावे हॉटेल मालक फैज अली, आक्शा कारीया, जनरल मॅनेजर सचिन यादव, इव्हेंट मॅनेजर हॅनक, ईडीएम वर्ल्ड इव्हेंट कंपनीचे मालक अक्षय स्वामी, ऋषभ खाडे आणि आयुष बजाज अशी आहेत.पोलिसांनी दिलेल्या माहितीनूसार पार्टीचे आयोजन रविवारी (१७ ऑगस्ट) सायंकाळी करण्यात आले होते. मात्र पोलिसांनी १६ ऑगस्ट रोजीच हॉटेल मालकांना परवाने सादर करण्याचे आदेश दिले होते. तरीदेखील आदेश धाब्यावर बसवून पार्टीचे आयोजन करण्यात आले.दरम्यान, पार्टी संपल्यानंतर मद्यधुंद अवस्थेतील तरुणांनी रस्त्यावर धिंगाणा घालत दारूच्या बाटल्या फोडल्या. स्थानिक रहिवाशांनी आक्षेप घेतल्यावर तरुणांनी शिवीगाळ केली. त्यामुळे नागरिक आणि हॉटेल मालक यांच्यात वाद निर्माण झाला. यामुळे परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले.तात्काळ मुंढवा पोलीस ठाण्याच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक माया देवरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत हस्तक्षेप करून परिस्थिती नियंत्रणात आणली. या प्रकरणाचा तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक कल्पना सुरवसे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

# भाटघर धरण १०० टक्के भरले ; नदी काठच्या गावांना सतर्कतेचा इशारा

भोर । प्रतिनिधी

गेल्या दोन दिवसांपासून भाटघर धरण पाणलोट क्षेत्राच्या पश्चिम भागात मुसळधार पाऊस सुरू असल्याने रविवारी (दि.१७) धरण पूर्ण क्षमतेने भरले. धरणातून रविवारी १६३१ क्युसेक वेगाने पाण्याचा विसर्ग वीज निर्मिती केंद्राद्वारे सुरू केला होता तर धरणाच्या एकूण ४५ स्वयंचलित दरवाजांपैकी ५ स्वयंचलित दरवाज्यातून १४१३ क्युसेक वेगाने पाण्याचा विसर्ग झाला. एकूण ३०४४ क्युसेक विसर्ग सोडल्याने यामुळे नीरा नदीच्या पाणीपात्रात वाढ झाली असून नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.



गेल्या दहा ते बारा दिवसांपासून भाटघर धरण पाणलोट क्षेत्रात पावसाचा जोर कमी झाला होता. परंतु गेल्या दोन दिवसांपासून पावसाचा जोर वाढल्याने धरणातील पाण्यामध्ये झपाट्याने वाढ झाली. भाटघर धरण पूर्ण क्षमतेने भरले असून धरणातून विसर्ग सुरू केल्याने नीरा नदी दुथडीने वाहत आहे. धरणांमधून रविवारी १६३१ क्युसेक वेगाने पाण्याचा विसर्ग वीज निर्मिती केंद्राद्वारे सुरू केला. तर, स्वयंचलित दरवाज्यातून १४१३ क्यूसेक वेगाने पाण्याचा विसर्ग, असा एकूण ३०५० क्युसेक वेगाने नीरा नदीत पाण्याचा विसर्ग झाला. धरणातून विसर्ग सुरू केल्याने नीरा नदीच्या पाण्यात झपाट्याने वाढ झाली आहे.


यामुळे नीरा नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.नागरिकांनी नीरा नदीपात्रात उतरू नये, नदीच्या पात्रात कुठल्याही विभागाचे काम सुरू असेल तर त्या विभागाने बांधकाम साहित्य व कामगार यांना सुरक्षित ठिकाणी हलवावे, नदीच्या काठावरील सर्व गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात येत आहे. नदीपात्रात पिण्याच्या व शेतीसाठी असलेले पंप सुरक्षित ठिकाणी हलवण्यात यावे. कृपया सखल भागातील संबंधित नागरीकांना सूचना देण्यात येत आहे. सर्वांनी योग्य ती खबरदारी व दक्षता घ्यावी. असा इशारा भोरचे तहसीलदार राजेंद्र नजन व पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता दिगंबर डुबल यांनी दिला आहे.

# हिंदू आध्यात्मिक सेवा समितीच्या अध्यक्षपदी कृष्णकुमार गोयल यांची निवड

**पुणे । प्रतिनिधी**

हिंदू समाजाच्या आध्यात्मिक उन्नतीसाठी आणि सामाजिक संघटनबांधणीसाठी अखंड कार्यरत असलेल्या हिंदू आध्यात्मिक सेवा समितीच्या अध्यक्षपदी पुण्यातील प्रसिद्ध बांधकाम व्यावसायिक आणि कोहिनूर ग्रुपचे चेअरमन कृष्णकुमार गोयल यांची सर्वानुमते निवड झाली आहे.

नुकत्याच झालेल्या समितीच्या सभेत ही निवड जाहीर करण्यात आली. याप्रसंगी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे अखिल भारतीय कार्यकारिणी सदस्य सुहास हिरेमठ यांच्या हस्ते नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्रे प्रदान करण्यात आली. समितीचे अखिल भारतीय संयोजक गुणवंतसिंग कोठारी आणि पुणे महानगर कार्यवाह सचिन भोसले यांची या वेळी प्रमुख अतिथी म्हणून उपस्थिती होती. समितीचे महामंत्री किशोर येनपुरे यांनी नव्या कार्यकारिणीची घोषणा केली.



त्यानुसार खालीलप्रमाणे पदाधिकारी नियुक्त करण्यात आले:

उपाध्यक्ष: पंडित शिवकुमार शास्त्री

संयोजक: किशोर येनपुरे सहसंयोजक: ॲड. संदीप सारडा मठ–मंदिर उपाध्यक्ष: संजय भोसले प्रशासकीय संस्था उपाध्यक्ष: सीए राधेश्याम अगरवाल, चरणजीतसिंग सहानी कार्यालय प्रमुख: योगेश भोसले

कोषाध्यक्ष (कॉर्पोरेट): नितीन पाटणकर, संजय गांधी, नितीन पैलवान, गुरुबक्षसिंह मखेजा कोष कॉर्पोरेट मार्गदर्शक: प्रल्हाद राठी दस्तावेजीकरण: प्रकाश ढगे, उदय कुलकर्णी जाती समूह प्रमुख: सिद्धेश कांबळे, राजन बाबू प्रतिष्ठित व्यक्तींशी संपर्क: सीए डॉ. केतन जोगळेकर, कुंदन साठे, संतोष डिंबळे, सीए सुनील सुरतवाला, राजेश मेहता महिला सहभागाला प्रोत्साहन देत मातृशक्ती विभागाची जबाबदारी ॲड. कीर्ती कोल्हटकर, अनुपमा दरक, विद्या घाणेकर यांच्याकडे सोपवण्यात आली आहे. तसेच, मार्गदर्शक मंडळात महेश सूर्यवंशी, राजेंद्र भाटिया, सुभाष परमार आणि सुनंदा राठी यांची निवड झाली आहे. एकूण ७० पदाधिकाऱ्यांचा समावेश असलेल्या या नव्या कार्यकारिणीमुळे समितीच्या कार्याला नवीन दिशा आणि गती प्राप्त होईल, असा विश्वास सभेत व्यक्त करण्यात आला. हिंदू आध्यात्मिक सेवा समितीच्या माध्यमातून सामाजिक आणि आध्यात्मिक क्षेत्रात नव्या उपक्रमांना चालना देण्याचा संकल्पही यावेळी करण्यात आला.

# पिंपरी-चिंचवडच्या पाणीपुरवठा सक्षमीकरणासाठी आमदार लांडगेंनी मुख्यमंत्र्यांकडे केली मोठी मागणी

पिंपरी । प्रतिनिधी

पिंपरी–चिंचवड शहराची लोकसंख्या सध्या ३५ लाखांच्या घरात आहे. २०५१ मध्ये शहराची लोकसंख्या सुमारे १ कोटीच्या घरात राहील. त्यानुसार शहराला किमान ८०० एमएलडी पाणी पुरवठा करण्याची आवश्यकता आहे. परिणामी, पाणी पुरवठा नवीन जलस्त्रोत निर्मिती आणि सुरू असलेल्या योजना सक्षमपणे राबवण्याची आवश्यकता आहे. त्यासाठी संबंधित विभागाचे मंत्री महोदय आणि प्रमुख अधिकारी यांची आढावा बैठक घ्यावी आणि 'क्शन प्लॅन' तयार करावा, अशी मागणी भाजपा आमदार महेश लांडगे यांनी केली आहे.



याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन पाठवले आहे. त्यामध्ये म्हटले आहे की, सध्यस्थितीला शहरासाठी पवना, आंद्रा, भामा आसखेड धरणातून पाणी उपलब्ध होते. पवना बंद जलवाहिनी प्रकल्पावरील 'जैसे थे' आदेश उठवण्यात आला आहे. मात्र, अद्याप काम सुरू झालेले नाही. आंद्रा धरणातून १०० एमएलडी पाण्याचा पुरवठा सुरू झाला आहे. भामा आसखेड प्रकल्पाचे काम प्रगतीपथावर आहे. सदरचे काम गतीमान करण्याची आवश्यकता आहे.

दरम्यान, वाढती लोकसंख्या आणि शहराची गरज लक्षात घेता चासकमान, ठोकरवाडी आणि मुळशी धरणातून शहरासाठी पाणी आरक्षीत करण्याबाबत राज्य सरकारकडे प्रस्ताव आहे. शहरातील वाढत्या गृहनिर्माण सोसायटींमध्ये पाणी पुरवठा बाबत तक्रारी निर्माण होत आहेत. त्या अनुशंगाने नवीन जलस्त्रोतांबाबत प्रशासनाची तयारी, सुरू असलेले पवना बंद जलवाहिनी आणि आंद्रा–भामा–आसखेड प्रकल्पाच्या कामाला गती देणे आणि शहराचा पाणी पुरवठा सक्षम करणे याबाबत जलसंपदा मंत्री, नगरविकास मंत्री यांच्यासह संबंधित विभागाचे मंत्री महोदय आणि उच्चाधिकारी यांची आढावा बैठक आपल्या अध्यक्षतेखाली नियोजित करावी, अशी विनंतीही आमदार लांडगे यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांच्याकडे केली आहे.

# पृथ्वी वाचवण्यासाठी पर्यावरण संरक्षण काळाची गरज -शोभाताई धारीवाल

पुणे । प्रतिनिधी

रसिकलाल एम. धारीवाल फाऊंडेशनच्या वतीने दरवर्षी आयोजित करण्यात येणाऱ्या 'उवसग्गहरं स्तोत्र' सामूहिक जपाचा भव्य कार्यक्रम यंदा रविवारी, १७ ऑगस्ट रोजी सायंकाळी ४ वाजता बिबवेवाडी येथील श्रीमान रसिकलालजी एम. धारीवाल स्थानकात संपन्न झाला. या कार्यक्रमात जैन धर्मातील मान्यवर संत, सामाजिक कार्यकर्ते, उद्योजक, विद्यार्थी आणि जैन–अजैन बंधू–भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या नवव्या वर्षी आयोजित कार्यक्रमात सकारात्मक ऊर्जेचा संचार आणि पर्यावरण संरक्षणाचा संदेश देण्यात आला.

रसिकलाल एम. धारीवाल फाऊंडेशनच्या अध्यक्षा शोभाताई आर. धारीवाल यांनी सांगितले की, जैन धर्मातील मूल्ये आणि संस्कारांची परंपरा हजारो वर्षांपासून अखंडित आहे. त्यांनी उवसग्गहरं मंत्राचे महत्त्व विशद करताना सांगितले की, हा मंत्र संकटांवर मात करणारा आहे. श्रीमान रसिकलाल धारीवाल यांना रुग्णालयात व्हेंटिलेटरवर असताना वैद्यकीय सेवेसोबतच या मंत्राच्या रोजच्या जपाने सकारात्मक ऊर्जा निर्माण झाली आणि त्यांचे प्राण वाचले, अशी आपली धारणा त्यांनी व्यक्त केली. याच विश्वासातून फाऊंडेशनद्वारे दरवर्षी सामूहिक स्तोत्र जपाचे आयोजन केले जाते, ज्यामुळे समाजात सकारात्मक भावना निर्माण होतात. यंदाही या कार्यक्रमात जैन समाजासह अजैन बंधूंनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला.




शोभाताई यांनी पर्यावरण संरक्षणावर विशेष भर देत म्हणाल्या, पृथ्वीला वाचवायचे असेल तर पर्यावरण वाचवणे ही काळाची गरज आहे. रसिकलाल एम. धारीवाल फाऊंडेशनद्वारे आरोग्य, शिक्षण आणि पर्यावरण क्षेत्रात भारतभर कार्य केले जाते. गरजू आणि हुशार विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीच्या माध्यमातून उच्च शिक्षणासाठी मदत, तसेच अत्यवस्थ शाकाहारी रुग्णांना आर्थिक सहाय्य केले जाते. फाऊंडेशनच्या अध्यक्षा जान्हवी धारीवाल बालन यांच्या नेतृत्वाखाली ५० ते १०० वर्षे वयाची मोठी झाडे वाचवण्याची मोहीम हाती घेण्यात आली आहे. आतापर्यंत २,१०० हून अधिक झाडांचे पुनर्रोपण करून त्यांना वाचवण्यात यश मिळाले आहे. शोभाताई यांनी यावेळी सांगितले की, बांधकाम किंवा रस्ते विस्तारासाठी मोठ्या प्रमाणात होणारी वृक्षतोड थांबवण्यासाठी वृक्षारोपण हा पर्याय नसून, वृक्ष पुनर्रोपण हा अधिक प्रभावी उपाय आहे. त्यांनी उपस्थितांना पर्यावरण संरक्षणासाठी योगदान देण्याचे आवाहन केले.

**डीजे मुक्त दहीहंडी उत्सवाचे कौतुक**

यंदाच्या दहीहंडी उत्सवाचे डीजे मुक्त आयोजन करणाऱ्या बालन ग्रुपचे अध्यक्ष पुनीत बालन यांचे शोभाताई यांनी विशेष कौतुक केले. त्या म्हणाल्या, जान्हवी धारीवाल बालन आणि पुनीत बालन यांनी पर्यावरण आणि पृथ्वीच्या संरक्षणाची जबाबदारी खांद्यावर घेतली आहे. त्यांनी या कार्यासाठी दोघांचे अभिनंदन केले.

# श्रावणातील शेवटच्या सोमवारी चिंबळीच्या महादेव मंदिरात भाविकांची गर्दी

खेड । प्रतिनिधी

तालुक्यातील औद्योगिक क्षेत्रातील कुरूळी, चिंबळी, मोई आणि मरकळ परिसरात श्रावण महिन्यातील शेवटच्या सोमवारी महादेव मंदिरात दर्शनासाठी भाविक आणि महिलांची मोठ्या प्रमाणात गर्दी झाली होती. श्रावण महिन्यातील या शेवटच्या सोमवारी चिंबळी (ता. खेड) येथील महादेव मंदिराला आकर्षक विद्युत रोषणाईने सजवण्यात आले होते.

मंदिराच्या गाभाऱ्यात विविध फुलांनी सुंदर सजावट करण्यात आली होती. पहाटे अभिषेक विधी संपन्न झाला. यावेळी बेलपत्र आणि फुले अर्पण करण्यासाठी तसेच दर्शनासाठी भाविक आणि महिलांची मोठी गर्दी झाली होती. दुपारी संगीत भजनांचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. याप्रसंगी विविध मान्यवरांच्या वतीने केळी आणि महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.

# डिजिटल मॅमोग्राफी व्हॅनद्वारे महिलांसाठी स्तन कर्करोग तपासणी शिबिर

## पिंपरी चिंचवड शहरातील ७० हून अधिक महिलांनी घेतला लाभ

पिंपरी । प्रतिनिधी

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वैद्यकीय विभाग व इंडियन मेडिकल असोसिएशन (पीसीबी शाखा) यांच्या संयुक्त विद्यमाने स्व. इंदिरा गांधी प्रसूतीगृह, सांगवी रुग्णालय येथे महिलांसाठी विशेष स्तन कर्करोग तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे व इंडियन मेडिकल असोसिएशन (पीसीबी शाखा) चे डॉ. दिलीप कामत यांच्या हस्ते शिबिराचे उद्घाटन करण्यात आले.

या शिबिरात अत्याधुनिक डिजिटल मॅमोग्राफी व्हॅनचा वापर करण्यात आला. या व्हॅनमध्ये उच्च रिझोल्यूशन एक्स–रे तंत्रज्ञान, संगणकीय प्रतिमा प्रक्रिया प्रणाली, आणि तज्ज्ञ तांत्रिक कर्मचारी उपलब्ध असतात. यामुळे स्तनातील गाठ, ऊतकांतील सूक्ष्म बदल किंवा कर्करोगाची प्रारंभिक लक्षणे अगदी कमी डोसच्या किरणोत्सर्गाने अचूकपणे शोधता येतात. डिजिटल पद्धतीमुळे तपासणीचे परिणाम त्वरित मिळतात व त्यांचे संग्रहण पुढील उपचारासाठी सुलभ होते.या उपक्रमाद्वारे महिलांना मोफत तपासणीची सुविधा मिळाली. शिबिरात ७० हून अधिक महिलांनी तपासणी करून घेतली व स्तन कर्करोग प्रतिबंधाबाबत मार्गदर्शन मिळविले.या प्रसंगी ज्येष्ठ वैद्यकीय अधिकारी डॉ. तृप्ती सागळे, डॉ. ललित धोका, डॉ. मिलिंद सोनवणे, डॉ. प्रकाश रोकडे तसेच डॉ. रितू लोखंडे उपस्थित होते. सर्व






मान्यवरांनी महिलांनी नियमित आरोग्य तपासणी करून घेण्याचे महत्त्व अधोरेखित केले.शिबीर यशस्वी करण्यासाठी नोडल अधिकारी डॉ. वैशाली भामरे, वैद्यकीय अधिकारी डॉ. करुणा साबळे, सांगवी रुग्णालयातील कर्मचारीवृंद तसेच आशा स्वयंसेविका यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.येत्या काळात अशा शिबिरांचे आयोजन महापालिकेच्या विविध रुग्णालयांमध्ये करण्याचे योजिले असून, नागरिकांनी जास्तीत जास्त सहभाग नोंदवून लाभ घ्यावा असे आवाहन वैद्यकीय विभागातर्फे करण्यात आले आहे. स्तनाचा कर्करोग हा वाढत्या प्रमाणात आढळत असला तरी वेळेत निदान झाल्यास तो पूर्णपणे बरा होऊ शकतो. या अनुषंगाने डिजिटल मॅमोग्राफी व्हॅन सारखी आधुनिक साधने ग्रामीण व शहरी भागातील जास्तीत–जास्त महिलांपर्यंत पोहोचावी हा आमचा मानस आहे आणि या शिबिराच्या माध्यमातून तो प्रभावीपणे पूर्ण होत असल्याचे दिसत आहे.– डॉ. लक्ष्मण गोफणे, आरोग्य वैद्यकीय अधिकारी, पिंपरी चिंचवड महापालिका

# अन् तिच्या प्रेमापोटी आई–वडील पुन्हा आले एकत्र ..! घर सोडून जाण्याच्या दहावीच्या विद्यार्थीनीच्या मदतीला धावल्या 'दामिनी दीदी'

पुणे : : वडील क्लासवन अधिकारी अन् आई, उच्चशिक्षीत पण गृहिणी. त्यांना एकच मुलगी. ती इंग्रजी माध्यमातील नामांकित शाळेत दहावीच्या वर्गात. मुलगी वर्गातील हुशार व टॉपर विद्यार्थीनी. मात्र, ती अचानक गेल्या काही महिन्यांपासून शांत–शांत व कोणाशी बोलत नाही आणि काही सांगतही नाही, ही बाब शिक्षकांनी हेरली. त्यांनी शिवाजीनगर पोलिसांच्या दामिनी मार्शलच्या 'दीदी' महिला पोलिस शिपाई सोनाली हिंगे यांना सांगितली. लागलीच हिंगे यांनी शाळेत मार्गदशन पर शिबीर घेत काही अडचण असल्यास सांगण्याचे आवाहन केले. या आवाहनानंतर अचानक एका मुलीचा त्यांना फोन आला अन् दीदी, मला तुमच्या मदतीची गरज आहे, अशी विनंती केली. पोलिस शिपाई सोनाली हिंगे यांनी तत्काळ तिच्याकडे जात 'बोल, काय मदत हवी' अशी विचारणा केली. तेव्हा तिने, मला घर सोडून जायचे आहे, असे सांगत कहाणी सांगितली. तिचे हे सर्व एकूण सोनाली हिंगे यांनाच गहिवरून आले. त्यांनी तत्काळ तिच्या आई–वडिलांना बोलवले व तिच्या मनाची घालमेल दाखवून दिली. तेव्हा आई–वडिलही मुलीच्या प्रेमापुढे झुकले. त्यांनी त्याक्षणी घटस्फोटाचा निर्णय बदलत पुन्हा एकत्र येण्याचा निर्णय घेतला. या निर्णयाने पोलिस, शिक्षक अन् दाम्पत्यासह मुलीचे डोळे पानावले. विभक्त होणाऱ्या कुटुंबाला पुन्हा एकत्र आणण्याचे कारण आणि नैराश्यातून घरातून निघून जाण्याच्या मानसिकतेत असलेल्या मुलीला पुन्हा विचार बदलण्यास कारणीभूत ठरलेल्या शिवाजीनगर पोलिस ठाण्यातील दामिनी पथकातील सोनाली हिंगे यांचे सर्व स्थरातून कौतुक होत आहे. वरिष्ठ पोलिस निरीक्षक महेश बोळकोटगी यांनी त्यांचे अभिनंदन केले. संबंधित मुलगी एका इंग्रजी माध्यमाच्या शाळेत दहावीच्या वर्गात शिकते. ती वर्गातील टॉपर आहे. अत्यंत खेळकर चालती बोलती. पण ती अचानक शांत–शांत राहू लागली. दरम्यान, पुणे पोलिसांच्या दामिनी मार्शलकडून 'पोलिस दीदी' या उपक्रमाअंर्तगत शाळा व महाविद्यालयात मार्गदर्शन केले जाते. 'बॅड टच, गुड चट' तसेच काही अडचणी असल्यास फोन करण्याचे व सांगण्याचे आवाहन केले जाते. दरम्यान, ही मुलगी शांत राहत असल्याने शाळेतील शिक्षक व प्राचार्यांना जाणवले होते. त्यांनी ही गोष्ट पोलिस शिपाई सोनाली हिंगे यांना सांगितली. हिंगे यांनी एक सत्र शाळेत घेत कोणाला अडचण किंवा काही सांगयचे असेल तर मला फोन करा. एक ताई व मैत्रिणी म्हणून विश्वासाने मला सांगा, मी मदत करेल, असे आवाहन केले होते. नंतर मुलीने हिंगे यांना फोन केला व दीदी मला तुमच्या मदतीची गरज आहे, अशी विनंती केली.





cmyk